# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१९

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### मुंबईमध्ये रेल्वे प्रवासादरम्यान होणा-या अपघातांबाबत

**(१) ३२५४ (२३-१२-२०१४). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेल्वेने प्रवास करणा-या मुंबईकरांचा रेल्वेच्या झालेल्या विविध अपघातांमध्ये माहे जानेवारी ते ऑक्टोबर, २०१४ या १० महिन्याच्या कालावधीत २८९० जणांचा बळी गेला आहे, असे दिनांक २१ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये रेल्वे रुळ ओलांडताना मृत्युमूखी पडलेल्यांची संख्या जास्त आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रवाशांचे अपघात टाळण्यासाठी शासनाने रेल्वे प्रशासनाकडे प्रस्ताव पाठवून विविध ठिकाणी पूल बांधणे, भुयारी मार्ग बांधणे यासाठी प्रयत्न केले आहेत काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०१८) :** (१), (२), (३) व (४) होय.

माहे जानेवारी ते डिसेंबर, २०१४ या कालावधीत मुंबई उपनगरातील पश्चिम रेल्वेच्या विविध अपघातामध्ये सुमारे १२०२ प्रवाशांचे मृत्यू झाले आहेत. तसेच मुंबई उपनगरातील मध्य रेल्वेच्या विविध अपघातामध्ये माहे जानेवारी ते ऑक्टोबर, २०१४ अखेर सुमारे १८७२ प्रवाशांचे मृत्यू झाले असून याच कालावधीत सुमारे १०१६ प्रवाशांचे रेल्वे मार्गिका ओलांडतांना मृत्यू झाले आहेत.

मुंबई उपनगरीय रेल्वेच्या मध्य रेल्वेच्यावतीने प्रवाशांचे अपघात होऊ नये व प्रवाशांनी रेल्वे मार्गिका ओलांडू नये म्हणून रेल्वे मार्गालगत कम्पाऊंड भिंत/संरक्षक भिंत बांधण्यात आली आहे. याशिवाय मध्य रेल्वेच्या मुंबई उपनगरी रेल्वेने उड्डाणपूले, सरकते जिने व बहुतेकत: प्रत्येक स्थानकावर प्रवाशांसाठी लिफ्ट उभारण्यात आल्या आहेत. तसेच पश्चिम रेल्वेने देखिल प्रवाशांचे अपघात टाळण्यासाठी व प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी प्रवाशांनी रेल्वे मार्गिका ओलांडू नये म्हणून वारंवार उद्घोषणा देणे, रेल्वेवरील पूलांचा वापर करणे,

उड्डाणपूले, सरकते जिने, रेल्वेगाडीला बाहेरुन न लटकणे, धावती गाडी न पकडणे याबाबत प्रत्येक स्थानकावर ध्वनीक्षेपकावरुन वांरवार उद्घोषणा देणे. राज्य शासनाने ॲन्टी ट्रेसपासींगचा विषय अभ्यासक्रमात ठेवणे यासारख्या उपायांचा समावेश पश्चिम रेल्वेकडून करण्यात आला आहे. तसेच, पश्चिम रेल्वेच्या २८ स्थानकांवर ८४ पादचाऱ्यासाठी रेल्वेवरील पूले, ६ भूयारी मार्ग बांधण्यात आले आहेत. याशिवाय प्रवाशांसाठी पूर्व व पश्चिम मार्गावरील रेल्वे रुळ ओलांडण्यासाठी राज्यशासन व बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत २५ उड्डाणपूले व ४ भूयारी मार्ग बांधण्यात आले आहेत. ११ नविन उड्डाणपूले व जुन्या उड्डाणपुलांची रुंदी वाढविण्याचे काम प्रगतीपथावर असून सन २०१७-१८ मध्ये २४ उड्डापूले नव्याने बांधण्याचे पश्चिम रेल्वेमार्फत प्रस्तावित आहे. तसेच मुंबई रेल्वे विकास महामंडळामार्फत मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत १२ रेल्वे स्थानकात प्रवाशांनी रेल्वे रुळ ओलांडू नये म्हणून १२ स्थानकात पूल, आकाशमार्गिका, सरकते जिने, आर.सी.सी. भिंत यासारख्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत. मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा-३ अंतर्गत ३६ भागात प्रवाशांनी रुळ ओलांडू नये म्हणून उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने कामे प्रगतीपथावर आहेत.

---

## राज्यात आगीमध्ये जखमी व मृत्यूमुखी पडणाऱ्या पिडितांना व वारसदारांना नुकसान भरपाई व नोकरी देण्याबाबत

**(२) ५५७७३ (२९-०८-२०१३) श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आगीमध्ये जखमी वा मृत्यूमुखी पडणाऱ्या पिडीतांसाठी नुकसान भरपाईची तसेच अग्निशमन अधिकारी व जवानांच्या वारसदारांना अनुकंपा तत्त्वावर नोकरी देण्याची योजना तात्काळ आखण्यात यावी असे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने शासनास दिले असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मुंबईतील मोठ्या इमारतीच्या आतील भागात अग्निसुरक्षा व्यवस्था बंधनकारक करण्याबाबत कायद्यात बदल करण्याची सूचनाही उच्च न्यायालयाने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-१२-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात २४ मीटर व त्यापेक्षा जास्त उंचीच्या इमारतींमधील भोगवटाधारकांना महाराष्ट्र अग्निप्रतिबंधक व जीव संरक्षक कायदा २००६ अन्वये अग्निसुरक्षा व्यवस्थेचे पालन करणे बंधनकारक आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात महाराष्ट्र अग्निप्रतिबंधक व जीव संरक्षक कायदा २००६ अन्वये इमारत तपासणीकरिता मुंबई अग्निशमन दलामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत एकूण १३१ नामनिर्देशित अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चाकण औद्योगिक प्राधिकरणाच्या प्रस्तावाबाबत

**(३) ६०१४९ (२२-०८-२०१६) ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड तालुक्यात मोठया प्रमाणात विकसित झालेल्या आणि जागतिक स्तरावर “ऑटो हब” म्हणून उदयास आलेल्या चाकण औद्योगिक क्षेत्रात स्वातंत्रपणे “चाकण आद्योगिक प्राधिकरण” स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीच्या प्रतिक्षेत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने चाकण औद्योगिक प्राधिकरण स्थापन करण्यासाठी शासनाद्वारे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१२-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) याबाबत उद्योग विभागाचे अभिप्राय घेण्यात आले. उद्योग विभागाने महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या नियम-२ (१८ A) मधील व्याख्येत काही बदल सूचविले असून त्या बदलांसंदर्भात विधी व न्याय विभागाचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बनावट दस्ताऐवज तयार करून भुखंडांची खरेदी करून जनतेची व शासनाची फसवणूक केल्याबाबत

**(४) ९३२९१ (०४-०९-२०१७) डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री.मनोज लक्ष्मण वाघमारे, रा.आनंद नगर, वार्ड क्र. १९ विश्रामगृहासमोर, चिखली, (ता.चिखली, जि.बुलढाणा) यांनी मौजे येथील शेत स.नं १६३/१ मधील जमीन मालक श्री सुरेश वामनआप्पा खबुतरे व सतिष वामनआप्पा खबुतरे रा.चिखली यांनी गुंठेवारी आदेश क्र. १३३१/२९०-२००६, १३३६/२९२/२००५ व १३३७/२९३/२००५ या क्रमांकाचे बनावट दस्ताऐवज तयार करून बनावट गुंठेवारी आदेशाच्या आधारे अनेक भुखंडाची खरेदी करून जनतेची व शासनाची फसवणूक केल्याचे नुकतेच माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात विभागीय आयुक्त, अमरावती यांनी दिनांक १५ मार्च, २०१७ रोजी पोलिस अधिक्षक, बुलढाणा यांना पत्र पाठवून बनावट दस्ताऐवज तयार करून बनावट गुंठेवारी आदेशाच्या आधारे झालेली खरीदी रद्द करून यास जबाबदार असणा-या व्यक्तींवर कारवाई करण्याचे आदेश देऊनही अदयापी कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने याप्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१२-२०१८) :** (१) मौजे चिखली येथील सर्व्हे क्र. १६३/१ या जमिनीवर जागा मालक श्री. सुरेश वामनआप्पा खबुतरे व श्री. सतिष वामनआप्पा खबुतरे यांनी गुंठेवारी अधिनियमांतर्गत अकृषक करून घेतलेल्या भूखंडांचा अकृषक भरणा व नगर परिषद चिखली यांचे शुल्क भरणा केलेले नसल्याने गुंठेवारी नियमितीकरणाचे आदेश पुर्णत: पारित झालेले नसतानाही सदर आदेशावर खरेदी झाली होती. मात्र, सदर आदेशावरील स्वाक्षरी, तत्कालीन मुख्याधिकारी तथा तहसिलदार श्री. सोळंकी यांची असल्याबाबत त्यांनी प्रतिज्ञालेख करून दिला आहे. उक्त गुंठेवारी नस्तीची पुर्नबांधणी करण्यात आली व सुधारित गुंठेवारी आदेश पारित करण्यात येवून उपरोक्त अनियमितता निकाली काढण्यात आली आहे.
(२) शासनाच्या मंजुरीनुसार नस्तीची पुर्नबांधणी करुन निर्णय घेण्यात आला आहे.
सबब, कर्मचारी/अधिकारी किंवा अन्य व्यक्तींवर कारवाई करणेचा प्रश्न उद्भवत नाही.
(३), (४) व (५) नाही, प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेच्या विविध विभाग कार्यालयात व रुग्णालयाच्या ठिकाणी सुरक्षा रक्षकांची भरती तसेच तलावांच्या ठिकाणी सीसीटीव्ही बसविण्याबाबत**

**(५) ९८१०५ (०६-०१-२०१८). श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेच्या विविध विभाग कार्यालयात व रुग्णालयाच्या ठिकाणी सुरक्षा रक्षकांच्या ९६८ जागा रिक्त असून त्या भरण्याकरिता महानगरपालिका प्रशासन दुर्लक्ष करित असल्याचे दिनांक २८ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईतील तलावांच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे व सुरक्षा रक्षक उपलब्ध नसल्याने तेथे येणाऱ्या - जाणाऱ्यांना असुरक्षित वाटत असल्यामुळे तातडीने या ठिकाणी सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनीकडून करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीनूसार सुरक्षा रक्षकांच्या जागा भरण्याबाबत तसेच तलावाच्या ठिकाणी सीसीटीव्ही बसविण्याबाबत महानगरपालिका प्रशासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-१२-२०१८) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सुरक्षा रक्षकांची १०२९ पदे रिक्त असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.
(२) अशा प्रकारची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींकडून करण्यात आली आहे हे खरे आहे.
(३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सुरक्षा रक्षकांची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीत असलेले तलाव मध्य वैतरणा, तानसा, तुलसी, विहार, मोडकसागर या पिण्याच्या पाण्याच्या तलावांच्या ठिकाणी महानगरपालिकेच्या सुरक्षा दलामार्फत सुरक्षा व्यवस्था पूर्वीपासून देण्यात आली आहे.

सदर ठिकाणी महानगरपालिकेमार्फत सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्यात आले आहेत.

---

**मौजे जूचंद्र (ता.वसई,जि.पालघर) येथील स.नं.३६६/२ या जागेवर विकासकाने अवैधरीत्या बांधकाम सुरु केल्याबाबत**

**(६) ९९५०२ (२१-१२-२०१७). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे जूचंद्र (ता.वसई, जि.पालघर) येथील श्रीमती दुर्गाबाई रामचंद्र पाटील यांच्या सं.नं.३६६/२ (जूना ३३१/२) या जागेवर विकासकाने अवैधरीत्या बांधकाम सुरु केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर जमीन हस्तगत करुन बांधकाम करणाऱ्या विकासकावर कारवाई करण्याबाबत तसेच श्रीमती दुर्गाबाई रामचंद्र पाटील यांना उक्त जमीन परत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१२-२०१८) :** (१) मौजे जुचंद्र येथील श्रीमती दुर्गाबाई रामचंद्र पाटील यांचा सं. नं. ३६६/२ (जुना ३३१/२) या जागेवर विकासक श्री. अरविंद ए.छेडा व इतर यांनी तत्कालीन नियोजन व विकास प्राधिकरण सिडकोची व वसई विरार शहर महानगरपालिकेची परवानगी घेतली असल्याचे वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सहारा ग्रुप अॅन्ड कंपनीज (ता.वसई, जि.पालघर) यांनी मौजे राजावली येथील जमिनीवर अनधिकृतपणे रस्ते बनविल्याबाबत**

**(७) १०२८७६ (२१-१२-२०१७) श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे राजावली (ता.वसई, जि.पालघर) येथील स.नं.५८/२, ५९/१, ६०, ७५/१ व इतर वर्णनाची जमीन मे. सहारा ग्रुप अॅन्ड कंपनीज यांचे नांवे दाखल असून उक्त कंपनीने सदर जागेत डी.पी.रोड अंतर्गत अनधिकृतपणे रस्ते बनविलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने संबंधित कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२९-१२-२०१८) :** (१) • सदर ठिकाणी रस्ते बांधकाम, संबधित विकासकांनी केलेले आहे. सदर रस्ते बांधकामासाठी विकासकाने महानगरपालिकेकडून परवानगी घेतलेली नाही.

• वसई विरार शहर महानगरपालिकेने स.नं.१११, हि.सं.५ A पैकी या मिळकतीसाठी १०१७०.०० चौ.मी. क्षेत्रातील जागेमध्ये बांधकाम परवानगी दिलेली आहे. सदर जागेचा काही भाग २०.०० मी. डी.पी.रोडने बाधित आहे.

• उक्त बांधकाम परवानगीसह लगतच्या सं.नं.५८/२, ५९/१, ६०, ७५/१ व इतर वर्णनाची जमिन जोडून या प्रस्तावाचे जागेचे क्षेत्रफळ अंदाजे १६ लाख ६४ हजार ५०० चौ.मी. असून सदर प्रस्तावास महानगरपालिकेने पर्यावरण विभागाची परवानगी मिळणेसाठी शर्ती व अटीवर नाहरकत दाखला दिला आहे.

• सदरचे रस्ते व रस्त्याखालील क्षेत्र विकासक यांच्या मालकीचा आहे. सदर मिळकतीवर इमारत बांधकाम व एकत्रिकरण परवानगी मिळण्यासाठी विकासक यांनी अर्ज केला असून विकासकाने आवश्यक कागदपत्रांची पुर्तता न केल्याने अर्ज प्रलंबित असल्याचे वसई विरार शहर महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई शहरातील इमारतीचे बांधकाम सुरु करण्यापूर्वी पर्जन्य जलवाहिन्या बांधण्याची विकासकांवर सक्ती करण्याबाबत**

**(८) १०४७६९ (१९-०४-२०१८). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात बांधण्यात येणा-या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यावर पर्जन्य जल वाहिनी **(storm water drain)** बांधण्यात येत असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीचे व विशेषतः एसआरए योजनेखालील इमारतीचे बांधकाम करतांना त्याठिकाणी भरणी केली केली जाते व पर्जन्य जल वाहिनीचे बांधकाम हे इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतरच करण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,काही इमारतीचे बांधकाम अनेक वर्षांपासून प्रलंबित असून इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यावर पर्जन्य जलवाहिनीचे बांधकाम विकासक घाईघाईने करित असून अनेक ठिकाणी परिसरातील जमिनीच्या पातळीनुसार वाहिनीची जोडणी केलेली नाही त्यामुळे पावसाच्या पाण्याचा निचरा योग्यरितीने होत नसून एकाच ठिकाणी पाणी तुंबुन राहून आसपासच्या भागात दुर्गंधी पसरुन रहिवाश्यांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त समस्या टाळण्यासाठी इमारतीचे बांधकाम सुरु करण्यापूर्वी पर्जन्य जल वाहिन्या **(storm water drain)** बांधण्याची विकासकांवर सक्ती करण्याबाबत प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, यासंदर्भात लोकप्रतिनिधिनी मा.मुख्यमंत्री, प्रधान सचिव, नगरविकास, महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे दिनांक १६ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निवेदन देऊन मागणी देखील केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, यासदंर्भात शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-१२-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) मुंबई शहरात झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत इमारतीचे बांधकाम करण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून परवानगी देण्यात येते.

सदर प्राधिकरणाने दिलेल्या इरादापत्र (एल.ओ.आय.) सह महानगरपालिकेच्या पर्जन्य जलवाहिन्या विभागाकडे विनंती केल्यास, सदर योजनेच्या विकासकास अथवा वास्तुविशारदास पर्जन्य जलवाहिनीचे बांधकाम करण्याबाबत अभिप्राय दिले जातात.

सदर योजनेतील नियोजित इमारतीचे जोते/स्टील्ट/तळघराच्या वरील भागाचे काम सुरु करण्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यापूर्वी पर्जन्य जलवाहिन्या विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार, पर्जन्य जलवाहिनीचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत निर्देश देण्यात येतात.

सदर काम पूर्ण झाल्यानंतर पर्जन्य जलवाहिन्या विभागाकडून काम यथायोग्य झाल्याचे प्रमाणपत्र घेण्यात येत असल्याचे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण विभागामार्फत कळविण्यात आले आहे.

(३) व (४) ज्या भूखंडावर इमारतीचे बांधकाम सुरु आहे, त्या भूखंडामधून वाहणाऱ्या पर्जन्य जलवाहिनीची पूर्ण बांधणी करेपर्यंत अस्तित्वात असलेली पर्जन्य जलवाहिनी कार्यान्वित ठेवण्यासाठी तसेच, पर्जन्य जलवाहिनीमध्ये पाणी तुंबणे, दुर्गंधी येणे या घटना होऊन आजुबाजूच्या रहिवाशांना त्रास होणार नाही यादृष्टीने तिची साफसफाई करणे, आवश्यक डागडुजी करणे इत्यादी सदर योजनेच्या विकासकाची जबाबदारी असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(५) सदर प्रकरणी लोकप्रतिनिधींनी दिनांक १३.११.२०१७ रोजीच्या पत्रान्वये, विकासकावर इमारतीचे बांधकाम सुरु करण्यापूर्वी पर्जन्य जलवाहिनीच्या बांधकामाची सक्ती करण्याची विनंती केली होती हे खरे आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जेरबाई वाडिया रोड, शिवडी (मुंबई) येथील शिवप्रसाद सहकारी गृहनिर्माण संस्थेबाबत**

**(९) १०५५६१ (०३-०४-२०१८). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जेरबाई वाडिया रोड, शिवडी (मुंबई) येथील शिवप्रसाद सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या इमारत क्र.११ मधील अनिवासी गाळ्यांचे वितरण करणे व ॲन्टॉपहिल, वडाळा येथील संक्रमण शिबिरातील इमारत क्र.६ ए, गाळा क्र.४१४ मधील घुसखोर व्यक्तिला बाहेर काढण्याबाबत मागणी करणारे निवेदन सहकारी गृहनिर्माण संस्थेतील रहिवाशांनी दिनांक १८ एप्रिल, २०१५ रोजी मा.गृहनिर्माण राज्यमंत्री यांना दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनावर मा.राज्य मंत्री यांनी महाव्यवस्थापक, शिवशाही पुनर्वसन प्रकल्प यांना दिनांक २० एप्रिल, २०१५ रोजी मंत्री कार्यालयीन नोंद क्र. १३७/२०१५ नुसार तात्काळ अहवाल सादर करावा असे आदेशही दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणीचा अहवाल गृहनिर्माण राज्यमंत्री यांना शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाने दिला आहे काय,
(४) असल्यास, त्यानुषंगाने पुढील कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे वा अद्याप कार्यवाही अहवाल सादर करण्यात आला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. प्रकाश महेता (२७-१२-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
जेरबाई वाडिया रोड, शिवडी येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील झोपडपट्टीवासियांसाठी तत्कालिन खाजगी विकासकास म्हाडाने ॲन्टाप हिल वडाळा येथील संक्रमण सदनिका उपलब्ध करुन दिल्या होत्या. त्यातील एक सदनिका श्री.गोपाळ आत्माराम गवाणकर यांना त्यांच्या व्यावसायिक वापराच्या झोपडीबद्दल संक्रमण गाळा म्हणून तत्कालिन खाजगी विकासकाकडून उपलब्ध करण्यात आला होता.

(३) अहवाल अद्याप दिलेला नाही. संक्रमण शिबिरातील इमारत क्र.६ ए, गाळा क्र.४१४ मधून श्री.गवाणकर यांना निष्कासित करण्याची कार्यवाही पूर्ण होताच अहवाल तातडीने सादर करण्यात येईल. असे महाव्यवस्थापक, शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित यांनी कळविले आहे.

(४) सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये श्री.गवाणकर यांना २४ चौ.फूट अनिवासी झोपडीच्या बदल्यात तेवढयाच क्षेत्रफळाच्या व्यावसायिक गाळयाचे वितरण पत्र दि.७ फेब्रुवारी,२००१ रोजी दिले. तथापि, श्री.गवाणकर यांनी तो गाळा न स्विकारता १८० चौ.फूट गाळयाचा आग्रह कायम ठेवला आहे. त्यामुळे संक्रमण शिबिरातील दुसरा निवासी सदनिकेचा ताबा त्यांनी दिलेला नाही. सदरहू सदनिका रिक्त करण्याकरिता त्यांना वारंवार नोटीसा बजावण्यात आल्या. तद्नंतर निष्कासनासाठी ॲन्टाप हिल पोलीस ठाण्याकडून अद्याप पोलीस बंदोबस्त होऊ शकला नसल्यामुळे, त्यांना निष्कासित करण्याची कार्यवाही करता आली नाही. त्यांच्या निष्कासन कार्यवाहीसाठी पोलीस बंदोबस्त मिळण्यासाठी पोलीस स्टेशनला पुन्हा विनंती करण्यात आली आहे.

---

### अंधेरी (मुंबई) येथील भोरी कॉलनीतील मामुन मंझिल इमारतीला आग लागल्याबाबत

**(१०) १०५७०४ (०३-०४-२०१८) श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (मुंबई) भोरी कॉलनीतील मामुन मंझिल इमारतीला दिनांक ०४ जानेवारी, २०१८ रोजी मध्यरात्री भिषण आग लागली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आगीत किती लोकांचा मृत्यु झाला आहे व किती जण गंभीर जखमी झाले आहेत,

(३) तसेच, सदर आग लागण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-१२-२०१८) :** (१) व (२) अंधेरी येथील भोरी कॉलनीतील मैमुन मंझिल या इमारतीला दिनांक ४ जानेवारी, २०१८ रोजी लागलेल्या आगीत ४ व्यक्ती मृत व ५ व्यक्ती जखमी झाल्या होत्या.

(३) सदर आग "सदोष विद्युत प्रणाली" मुळे लागली असल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

---

### राज्यातील मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर या प्रमुख शहरांमध्ये विकास कामांच्या आर्थिक नियोजनाचे आणि वित्तीय खर्चाचे नियोजन करण्याबाबत

**(११) १०५९७७ (१९-०४-२०१८) श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर या प्रमुख शहरांमध्ये ३ लाख ४१ हजार ४९०.९१ कोटी रुपयांची कामे सुरु केली असून विविध विकासकामांमुळे सद्यःस्थितीत राज्यावर सुमारे ५ लाख ६५ हजार कोटीचे कर्ज झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बहुसंख्य कामे कर्ज काढून करण्यात येत असल्याने भविष्यात त्याचा परिणाम राज्याच्या अर्थ व्यवस्थेवर होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या नव्याने होत असलेल्या विकास कामांच्या आर्थिक नियोजनाचे आणि वित्तिय खर्चाचे नियोजन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-१२-२०१८) :** (१) विविध विकास कांमानमुळे सद्य:स्थिती राज्यावर सुमारे ५ लाख ६५ हजार कोटीचे कर्ज आहे, हे खरे नाही.

सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पीय अंदाजानुसार सन २०१८-१९ अखेर राज्यावरील एकूण दायित्व रु. ४,६१,८०६.९५ कोटी होणे अपेक्षित आहे.
(२), (३) व (४) मुंबई मेट्रो लाईन-३, नागपूर मेट्रो, पुणे मेट्रो हे प्रकल्प केंद्र व राज्य शासनाचा संयुक्त सहभाग असलेल्या कंपनीमार्फत राबविण्यात येत आहेत. या प्रकल्पांसाठी केंद्रशासनाने कर्ज सहाय्य घेतले आहे. यापैकी मुंबई मेट्रो लाईन-३ करीता केंद्रशासनाने जायकाचे कर्ज घेतले असून सदर कर्ज ३० वर्षात परतफेड करावयाचे आहे. याकरीता व्याजाचा दर १.४% आहे.

मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रात मुंबई व ठाणे येथे मेट्रो २ अ, २ ब, मेट्रो मार्ग ४, मेट्रो मार्ग ५, मेट्रो मार्ग ६, मेट्रो मार्ग ७, मेट्रो मार्ग ९ व मुंबई ट्रान्स हार्बर लिंक (MTHL) हे प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत आहेत. सदर प्रकल्पांचा एकूण खर्च रु. ७७,७३६ कोटी इतका आहे. या व्यतिरिक्त इतर प्रकल्प रु. ५५,०२५ कोटी असे एकूण १,३२,७६१ कोटीचे प्रकल्प येत्या ५ ते ७ वर्षात राबविण्यात येणार आहेत. सदर प्रकल्प राबविण्यासाठी प्राधिकरण आर्थिक दृष्टया सक्षम असल्याने राज्य शासनाच्या तिजोरीवर याचा आर्थिक भार येणार नाही.

समृध्दी महामार्ग हा प्रकल्प महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत आहे. सदर प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी राज्यातील एमएमआरडीए, सिडको, म्हाडा, एसआरए व एमआयडीसी यासारख्या संस्थांकडून कर्ज स्वरुपात अर्थसहाय्य करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्य रस्ते महामंडळ मर्या. यांचेमार्फत नागपूर-मुंबई समृद्धी महामार्ग, मुंबई-पुणे यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्गाची क्षमतावाढ करणे, वांद्रे-वर्सोवा सी लिंक प्रकल्प, ठाणे-घोडबंदर उन्नत मार्ग बांधणे, सायन-पनवेल महामार्गावर ठाणे खाडीवर तिसऱ्या पुलाचे बांधकाम करणे, भिवंडी-कल्याण-शिळफाटा रस्त्याचे रुंदीकरण व उन्नत मार्ग बांधणे, इत्यादी प्रकल्प हाती घेण्याचे प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पांसाठी आर्थिक नियोजन वित्तीय संस्थांमार्फत कर्ज उभारणी करुन महामंडळामार्फत करण्यात येत आहे.

अशा प्रकारे प्रश्नाधीन प्रकल्प विविध संस्थां/प्राधिकरणे यांच्याकडील निधी व कर्जाची त्यांची जबाबदारी यावर राबविण्यात येत असून राज्याच्या अर्थसंकल्पावर अतिरिक्त ताण येणार नाही, याची खबरदारी घेण्यात आली आहे.

---

## राज्यात मनोरंजनाच्या ठिकाणी अग्निसुरक्षा यंत्रणेची अमंलबजावणी करण्याबाबत

**(१२) १०७१९४ (१९-०४-२०१८). श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मनोरंजनाच्या ठिकाणी अग्निसुरक्षेच्या यंत्रणेची काटेकोरपणे तपासणी होत नसल्याचे मुंबईत माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान कमला मिल परिसरातील रेस्टोपबमध्ये लागलेल्या आगीच्या दुर्घटनेनंतर निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने मनोरंजाच्या ठिकाणी अग्निसुरक्षा यंत्रणेची काटेकोरपणे अमंलबजावणी करण्याकरिता नियमावली तयार केली आहे काय व त्याचे स्वरूप काय आहे,
(३) असल्यास, त्याची अमंलबजावणी करण्याकरिता कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-१२-२०१८) :** (१) व (२) हॉटेल, रेस्टोपब, मनोरंजनाचे ठिकाण, बेकरी, मॉल्स, वेगवेगळया आस्थापना इमारती, तळघरे, उत्तुंग इमारती इत्यादी ठिकाणी आगीची दुर्घटना होऊन जीवितहानी व वित्तहानी होऊ नये म्हणून अग्निसुरक्षा यंत्रणेची कठोरपणे अंमलबजावणी करण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत प्रत्येक अग्निशमन केंद्रावर स्वतंत्र अग्निसुरक्षा पालन कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

सदर नियमावलीच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या आरोग्य खाते, अनुज्ञापन खाते, इमारत व कारखाने खाते तसेच आवश्यकता भासल्यास पोलीस विभागाच्या सहकार्याने मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३९०, ३९४, मुंबई प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ व महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षण अधिनियम २००६ अन्वये कारवाई करण्यात येते.
(३) व (४) एखाद्या ठिकाणी आग प्रतिबंधक उपाययोजनांचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास संबंधित भोगवटाधारकास किंवा मालकास महाराष्ट्र अग्निप्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ च्या कलम ६ अन्वये आवश्यक त्या उपाययोजना हाती घेण्याबाबत निर्देश देणारी नोटीस बजावण्यात येते.

आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजनांच्या अपर्याप्ततेमुळे अशा जागेची किंवा तिच्या भागाची स्थिती, त्यातील व्यक्तींना धोकादायक वाटत असेल तेव्हा, तेथील लोकांना बाहेर जाण्यास सांगून/काढून संबंधित इमारत, आस्थापना इत्यादी कलम ८(३) व नियम ११(१) नुसार सीलबंद करण्याची कारवाई करण्यात येते.

---

**अलिबाग ते विरार या मल्टिमॉडेल कॉरिडोर प्रकल्पासाठीच्या जमिन खरेदी प्रक्रियेबाबत**

**(१३) १०७७२२ (१८-०४-२०१८). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग ते विरार या मल्टिमॉडेल कॉरिडोर या प्रकल्पासाठी शासनाने खासगी वाटाघाटीव्दारे थेट जमीन खरेदी करण्याची प्रक्रिया राबविण्यास सुरुवात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जमीनी संपादित करतांना जमीन मालकास विश्वासात घेऊन सध्याच्या रेडीरेकनरच्या अडीचपट जमीनीची किंमत देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अलिबाग ते विरार या यामधील किती किलोमीटरचे अंतर कमी वेळेत वाहनांना पार करता येणार आहे व या रस्त्यावर सायकल व बससाठी स्वतंत्र मार्गिका करण्यात येणार आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, कॉरिडोर प्रकल्पाच्या कामाची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-१२-२०१८) :** (१) होय.

(२), (३), (४) व (५) सदर प्रकल्पासाठी जमीनीचा मोबदला महसूल विभाग, शासन निर्णय दिनांक १२.०५.२०१५ व महसूल विभाग, परिपत्रक दिनांक २५.०१.२०१७ अन्वये प्रदान करण्याचे नियोजित आहे. सदर प्रस्तावित विरार ते अलिबाग १२६.४२ कि.मी. लांबीच्या बहुउद्देशिय वाहतुक मार्गिकेकरीता लागणारा प्रवासाचा अंदाजित अवधी दिड तासाचा आहे. सदर रस्त्यामध्ये बससाठी स्वतंत्र मार्गिका नियोजित असून सायकल करीता स्वतंत्र मार्गिकेचे नियोजन नाही. तथापि, सदर रस्त्यामध्ये गैर मोटर चलित वाहतुकीकरीता स्वतंत्र मार्गिका प्रस्तावित असून सदर मार्गिकेचा वापर सायकल वाहनाकरीता करण्याचे प्रस्तावित आहे.

सदर प्रकल्पासाठी विविध परवानग्या घेण्याची तसेच भूसंपादनाची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. आवश्यक परवानग्या मिळाल्यानंतर व भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच सदर प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत हाती घेण्याचे नियोजित आहे.

---

**भांडूप (प.) न.भु.क्र.७१/अ पासपोली व्हिलेज, पवई या भूखंडावर चॅलेट हॉटेल प्रा.लि.च्या मागे (रेनिसन पंचतारांकित हॉटेल) केलेल्या बांधकामाबाबत**

**(१४) १०७८८३ (१४-०४-२०१८). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भांडूप (प.) न.भु.क्र.७१/अ पासपोली व्हिलेज, पवई या भूखंडावर चॅलेट हॉटेल प्रा.लि. च्या मागे (रेनिसन पंचतारांकित हॉटेल) केलेल्या बांधकामामुळे पवई, ताणसा, तुळशी तलावातीन

पाणी पुरवठा करणाऱ्या जलवाहिन्यांना धोका असल्याने सदर बांधकाम निष्कासीत करावे असे तक्रार निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दि.१५ नोव्हेंबर,२०१७ रोजी वा त्या सुमारास केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई उच्च न्यायालयाचे जलवाहिन्यांची सुरक्षितता धोक्यात आणणारे बांधकामे व झोपडपट्या निष्कासित कराव्यात असे आदेश असतांना मुंबई महानगरपालिकेच्या एस विभागाच्या सक्षम अधिकाऱ्यांनी कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, मा.मुख्यमंत्री यांना दिलेल्या तक्रार निवेदनाच्या अनुषंगाने चॅलेट प्रा.लि. हॉटेलने केलेले बांधकाम निष्कासित करण्याबाबतच्या कार्यवाहीचे स्वरुप व सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-१२-२०१८) :** (१) अशा आशयाची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(२) व (३) भांडुप (प.) येथील न.भू.क्र.७१/अ, पासपोली व्हिलेज, पवई येथील चॅलेट हॉटेल प्रा.लि. (रेनिसन पंचतारांकित हॉटेल) च्या मागील बाजूस असलेल्या पवई, तानसा व तुळशी तलावामधून पाणी पुरवठा करणाऱ्या जलवाहिन्यांच्या जवळील भिंतीचे व परिसराचे महानगरपालिकेमार्फत दिनांक १३.११.२०१७ व दिनांक २४.०९.२०१८ रोजी स्थळनिरीक्षण केले असता, संबंधित भिंतीचे व इतर इमारतीचे बांधकाम हे भोगवटा प्रमाणपत्रासोबत देण्यात आलेल्या मंजूर आराखडा/नकाशाप्रमाणे केले असल्याचे आढळून आले आहे.

तसेच, रेनिसन्स हॉटेलची हद्द व जलवाहिन्यांदरम्यान अनधिकृत झोपडया आढळून आल्या नसल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

---

### उल्हासनगर महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागात काम करणाऱ्या व्यक्तीने केलेला आत्महत्येचा प्रयत्न

**(१५) १०८१७७ (१४-०४-२०१८). श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर महानगरपालिकेच्या कर विभागात व तद्नंतर अतिक्रमण विभागात काम करणारे दयाराम डोभाळे यांनी जनसंपर्क अधिकारी युवराज भदाने व महानगरपालिका आयुक्त राजेंद्र निंबाळकर हे मानसिक छळ करीत असून हेतूपुरस्सर अन्याय करीत असल्याबद्दल सविस्तर चिट्ठी लिहून महानगरपालिका मुख्यालयात फिनायल हे द्रव्य पिऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याची बाब दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वी मालमत्ता कर विभागात काम करीत असताना श्री.भदाने यांनी जातीवाचक शिव्या देऊन वेळोवेळी अपमान केल्याबद्दल दयाराम डोभाळे यांनी महानगरपालिका

आयुक्त, पोलीस आयुक्त, उपायुक्त, अप्पर पो.आयुक्त इ.कडे तक्रारी करुनही न्याय मिळत नसल्याने माझ्या आत्महत्येस महानगरपालिका आयुक्त व युवराज भदाने हेच कारणीभूत असल्याबद्दल लेखी लिहिलेल्या चिठ्ठीत असलेल्या उल्लेखानुसार जनसंपर्क अधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांचेविरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याबद्दल कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) असल्यास, अप्पर पोलीस आयुक्त, कल्याण यांनी युवराज भदाने यांच्यावर ॲट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करण्याचे आदेश देऊनही, आयुक्त राजेंद्र निंबाळकर यांनी कोणतीही कारवाई न करता हे प्रकरण निकाली काढण्याचे पत्र महानगरपालिका आयुक्त यांनी पोलीस खात्याला दिल्याची बाब चिठ्ठीत नमूद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या चिठ्ठीत आत्महत्येपूर्वी नमूद केलेल्या बाबींपैकी किती गंभीर बाबींचा तपास पूर्ण झाला आहे व या तपासाचे निष्कर्ष काय आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-१२-२०१८) :** (१) उल्हासनगर महानगरपालिकेतील कर्मचारी श्री.दयाराम ढोबाळे यांनी दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी लायझॉल नावाचे फिनाईल पिऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला असल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.
(२), (३) व (४) उल्हासनगर महानगरपालिकेचे कर्मचारी श्री. दयाराम डोभाळे यांनी दिनांक ०२.०१.२०१८ रोजी दिलेल्या फिर्यादीवरुन उल्हासनगर महानगरपालिकेचे सहायक आयुक्त श्री. युवराज भदाने यांचेविरुध्द मध्यवर्ती पोलीस ठाणे, उल्हासनगर येथे गु. र. क्रमांक २/२०१८, भा.दं.वि. ५०६ सह अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक सुधारणा अधिनियम २०१६ चे कलम ३(१),(R),(S),(U) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चेंबूर (मुंबई) येथील सहकार नगरातील चित्रा हाऊसिंग सोसायटीने स्वयं पुर्नविकास निवडला असल्याबाबत

**(१६) १०८३४१ (१८-०४-२०१८) श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत विकासकाच्या धोरणाचा फटका पुर्नविकास करु इच्छिणाऱ्या गृहनिर्माण सोसायट्यांना बसत असल्याने चेंबूर येथील सहकार नगरातील चित्रा हाऊसिंग सोसायटीने स्वयं पुर्नविकास निवडला असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त सोसायटीने स्वयं पुर्नविकास निवडल्यामुळे रहिवाशांना १३०० चौरस फुटांचे घर आणि प्रत्येकी ३२ लाख रुपयांचा कार्पस फंड मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकल्पाच्या माध्यमातून सोसायट्यांच्या सदस्यांना मोठी घरे, दर्जेदार काम, अधिक कार्पस फंड, मेनटेन्स फी व अतिरिक्त एफएसआयच्या विक्रीतून मिळणारा सर्व नफा गृहनिर्माण सोसायट्यांना मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विकासकाचे धोरण पुर्नविकास करु इच्छिणा-या गृहनिर्माण सोसायटयांना लागु करणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१४-१२-२०१८) :** (१) म्हाडाच्या अहवालानुसार चेंबूर येथील सहकार नगरातील चित्रा हौसिंग सोसायटीने स्वयं पुनर्विकासाचा प्रस्ताव दि. ११.१०.२०१७ रोजी सादर केलेला आहे. सदरहू प्रस्तावास म्हाडाने दि. १६.०७.२०१८ रोजी मान्यता दिली असून संस्थेस दि. २५.०७.२०१८ रोजी देकारपत्र जारी करण्यात आले आहे.
(२) प्रस्तावासोबत संस्थेने सादर केलेल्या सभासदांचे संमतीपत्रात नमुद केल्यानूसार संस्थेच्या प्रत्येक सभासदांस एकूण उपलब्ध होणाऱ्या सदनिकांच्या चटई क्षेत्रफळाच्या ३.५७% चटई क्षेत्रफळाची सदनिका प्राप्त होणार आहे.
(३) संस्था स्वयंपुनर्विकास करत असल्याने या प्रकल्पातून होणारा नफा संस्थेस प्राप्त होणार असून सदर नफ्याच्या वाटपाबाबत संस्था निर्णय घेईल. संस्थेमार्फतच पुनर्विकास होत असल्याने पुनर्विकासाचा दर्जा उत्तम राखण्याची खातरजमा संस्था स्वत: करु शकेल.
(४) संस्थेने स्वयंपुनर्विकास करणे किंवा विकासकामार्फत पुनर्विकास करणे याचे सर्वस्वी अधिकार संस्थेला असतात. स्वयंपुनर्विकास करु इच्छिणाऱ्या गृहनिर्माण संस्थांना वि.नि.नि. ३३(५) च्या सर्व तरतुदी लागू आहेत. त्यामुळे वेगळे धोरण करण्याची आवश्यकता नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई मधील म्हाडाच्या मास्टर लिस्ट मधील मुळ कागदपत्राच्या नस्त्या गहाळ झाल्याबाबत**

**(१७) ११०६११ (०३-०४-२०१८) श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईमधील वर्षानुवर्षे हक्काच्या घरांच्या प्रतिक्षेत असलेल्या रहिवाशांच्या मास्टर लिस्ट मधील मुळ कागदपत्राच्या फायली म्हाडाचे अधिकारी व दलालाच्या संगनमताने गहाळ केले असल्याचे विक्रोळीच्या संक्रमण शिबीरातील रहिवाशी श्री रविंद्र पाबरेकर यांनी खेरवाडी पोलीस ठाण्यात तक्रार केली असल्याची बाब दिनांक २३ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने सदर प्रकरणी गुन्हा दाखल करून संबंधित म्हाडा अधिका-यांची चौकशी केली वा करण्यात येत आहे काय, त्याचा तपशिल काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२०-१२-२०१८) :** (१) होय. सदर आशयाचा तक्रार अर्ज खेरवाडी पोलीस ठाण्यात प्राप्त झालेला आहे.
(२) व (३) सदर तक्रारीच्या अनुषंगाने या प्रकरणी प्रथम खबरी अहवाल (FIR) दाखल केलेला

नसला तरी तक्रारीसंदर्भात सविस्तर चौकशी करुन त्या बाबतचा चौकशी अहवाल सादर करण्याबाबत खेरवाडी पोलिस ठाणे यांनी मुख्याधिकारी, म्हाडा, मुंबई तसेच मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी, म्हाडा, मुंबई यांना दिनांक २४.०८.२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविले आले आहे.

त्याचप्रमाणे म्हाडाच्या अहवालानुसार विचाराधीन तक्रार अर्जाची चौकशी करुन जबाबदारी निश्चित करण्यासंदर्भात दि. २९.०९.२०१७ च्या कार्यालयीन आदेशान्वये द्विसदस्यीय समिती स्थापन करण्यात आली होती. सदर समितीने त्यांचा अहवाल दि.०२.०१.२०१८ रोजी मुख्य अधिकारी यांना सादर केला असून त्यातील निष्कर्षानुसार सन १९९२ ते २०१० या कालावधी दरम्यान कार्यरत असलेल्या व सदर संचिका गहाळ होण्यास जबाबदार असलेल्या मिळकत व्यवस्थापक व अन्य संबंधित कर्मचारी यांच्यावर दि.२०.०३.२०१८ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून गहाळ संचिका पुनर्रचित करण्याची कार्यवाही मंडळामार्फत सुरु आहे.

---

**भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील सागर कॉम्प्लेक्स कंपनीतील रासायनिक गोदामास लागलेली आग**

**(१८) ११०९६९ (१२-०४-२०१८) श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील रासायनिक पट्ट्यातील ओवळीच्या हद्दीत असलेल्या सागर कॉम्प्लेक्समधील चेक पॉईंट या कंपनीतील १६ गोदामांना आग लागून कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाल्याची घटना माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-१२-२०१८) :** (१) होय.

(२), (३) व (४) सदर ठिकाणी दिनांक ०६ जानेवारी, २०१७ रोजी लागलेल्या आगीत सदर गोदामात साठवणूक असलेल्या मालाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे आढळले. तथापि, कोणत्याही प्रकारची जिवित हानी झालेली नाही. मौजे ओवळी, ता.भिवंडी, जि.ठाणे येथील

प्रश्नाधिन ठिकाणी अनधिकृत बांधकामाबाबत सर्व्हे नं.९ व १४ वरील विकास करणारे श्री.शंकर पवार (सागर डेव्हलपर्स) यांचेवर दिनांक १४ जानेवारी, २०१०, व दिनांक १७ ऑगस्ट, २०१० रोजी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ५३ (१) व कलम ५४ नुसार दिनांक २४ सप्टेंबर, २०१० रोजी नारपोली पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच विकासक यांना दिनांक १२.५.२०१६ रोजी अंतिम नोटीस दिलेली असून पुढील कार्यवाही प्राधिकरणाकडून नियोजित आहे.

---

**मौजे रांजनोली (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील खाजगी जमिनीवर अतिक्रमण करुन रस्ता वापरल्याबाबत**

**(१९) ११२०३७ (१२-०४-२०१८) श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे रांजनोली (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील खाजगी जमिनीवर अतिक्रमण करुन रस्ता वापरल्याबाबत तेथील लोकप्रतिनिधींनी दिनांक १८ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांच्याकडे तक्रार व निवेदन दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्व्हे नंबर.५३ व हि.नं.१३ या खाजगी जमिनीवर इको होम्स टाऊनशिप कंपनीने अतिक्रमण केलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी सदर कंपनीवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-१२-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत मौ. रांजनोली, ता.भिवंडी. जि.ठाणे येथील स.क्र. ३२, ३४, ३५, ३६, ३७, स.क्र. ४९ हि.नं. १ ते ९, स.क्र. ५०, ५१, स.क्र. ५२ हि.नं. २, ४/२, स.क्र. ५३ हि.नं.१अ, ८, १६, १८ या जमिनींवर विकासक मे. इको होम्स टाऊनशिप प्रा. लि. / मे. टाटा हाऊसिंग डेव्हलपमेंट कंपनी प्रा. लि. यांच्या भाडेतत्त्वावरील घरे या प्रकल्पास दि. २१.०५.२००९ रोजी लोकेशन क्लिअरन्स् प्रदान करण्यात आले व त्याअनुषंगाने विकासकास सदर प्रकल्पाकरीता दि.१९.०३.२०१० रोजी बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले आहे.

तसेच वरील जमिनींवर दि. २७.०६.२०१२ रोजी सुधारित बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. तद्नंतर दि. ११.०७.२०१३ रोजी सदर प्रकल्पास सुधारित लोकेशन क्लिअरन्स् प्रदान करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने मौ. रांजनोली, ता. भिवंडी. जि. ठाणे येथील स.क्र. ३२, ३४, ३५, ३६/आ/पै, ३६/ब, ३६/१, ३६/२, ३७/१, ३७/२, ३७/ब, ३७/क, ४९/१/१अ, ४९/१/१ब, ४९/१/२, ४९/२, ४९/३, ४९/४, ४९/५, ४९/६, ४९/७, ४९/८, ४९/९, ५०पै, ५१/१ पै व

५३/१८ या जमिनीवर दि.२६.११.२०१३ रोजी सुधारित बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र सदर प्रकल्पास प्रदान करण्यात आले आहे. वरील परवानग्या भाडेतत्त्वावरील घरे व भिवंडी परिसर अधिसूचित क्षेत्रासाठीच्या विकास नियंत्रण नियमावलीच्या तरतुदीनुसार सदर जमिनीकरीता संबंधित विकासकास प्रदान करण्यात आलेले आहेत. वर नमूद केलेल्या बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्रामध्ये मौ. रांजनोली, ता.भिवंडी. जि.ठाणे येथील स.नं. ५३, हि.नं. १३ या जमिनीचा समावेश नाही.

तथापि, विकासकाने सदरच्या प्रकल्पाकरीता मौ. रांजनोली, ता. भिवंडी. जि. ठाणे येथील स.क्र. ५३/१३ या जमिनीवरुन पोहच रस्त्याकरीता नोंदणीकृत 'Right of way' चे कागदपत्र प्राधिकरणास सादर केले आहे व त्याअनुषंगाने विकासकास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत वर नमूद केल्याप्रमाणेचे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र प्रदान केले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वांद्रे (प.) येथील अंजुमन इस्लामच्या मदिना या इमारतीमधील उर्दू माध्यमाच्या शाळेतील वर्गखोल्यांमध्ये चार भाडेकरूंनी घुसखोरी केल्याबाबत**

**(२०) ११२२५६ (१९-०४-२०१८) श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई मधील वांद्रे (प.) येथील अंजुमन इस्लामच्या मदिना या इमारतीमधील उर्दू माध्यमाच्या शाळेतील वर्गखोल्यांमध्ये चार भाडेकरूंनी सन २००९ पासून घुसखोरी केल्याचे माहे जानेवारी, २०१८ च्या शेवटच्या आठवड्यात आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू भाडेकरूंना बाहेर काढण्यासाठी एच/पश्चिम विभागाने इमारतीच्या मालकाशी पत्रव्यवहार करूनही मालक जुमानत नसल्याचेही आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी वांद्रे पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार चौकशी करून संबंधितांवर कोणत्या स्वरूपाची कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ओहत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-१२-२०१८) :** (१) वांद्रे (पश्चिम) येथील अंजुमन इस्लामच्या मदिना या इमारतीमधील उर्दू माध्यमाच्या शाळेतील वर्गखोल्यांमध्ये चार भाडेकरुंनी घुसखोरी केल्याचे सन २००९ मध्ये आढळून आले आहे ही वस्तुस्थिती आहे.

(२) सदर शाळेतील भाडेकरुंना बाहेर काढण्यासाठी महानगरपालिकेने अंजुमन इस्लाम ट्रस्ट यांचेशी पत्रव्यवहार केल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(३) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत तक्रार अर्ज प्राप्त झाला नसल्याने गुन्हा नोंद करण्यात आला नाही.

(४) व (५) सदर प्रकरणी अंजुमन इस्लाम ट्रस्ट यांचे वकीलामार्फत घुसखोरी करणाऱ्या चार भाडेकरुंना दिनांक २३.४.२०१८ अन्वये Eviction notice देण्यात आल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

---

**मुंबई शहरातील संक्रमण शिबीरांची झालेली दुरवस्था**

**(२१) ११२३६७ (०६-०४-२०१८) श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील सद्यस्थिती उपलब्ध असलेल्या संक्रमण शिबीरांची दुरवस्था झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्यस्थिती संक्रमण शिबीरांची संख्या किती व त्यापैकी रिक्त निवासी गाळे किती आहेत,

(३) असल्यास, धोकादायक इमारतींमधील रहिवाशी संक्रमण शिबीरात जाण्यास नकार देत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्याअनुषंगाने शासन उपाययोजना करणार आहे काय,

(५) असल्यास, संक्रमण शिबीरामध्ये मोठ्या प्रमाणात घुसखोरी होत असून, सदर घुसखोरी करणाऱ्यांवर शासन कोणती कार्यवाही करणार वा करित आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (१५-१२-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) मुंबई शहर व मुंबई उपनगरात मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारितील एकूण ३८ संक्रमण शिबीरे असून सदर संक्रमण शिबीरात २१९९४ संक्रमण गाळे आहे. सद्यस्थितीत त्यातील एकूण २७३ गाळे रिक्त आहेत.

(३) मुंबई शहरातील जुन्या धोकादायक उपकर प्राप्त इमारतीमधील बरेच भाडेकरू हे कौटुंबिक समस्या/शैक्षणिक समस्या, संक्रमण शिबीरातील गाळ्यांचे क्षेत्रफळ १८० चौ.फुटाचे असल्यामुळे तसेच संक्रमण शिबीरेही उपनगरात असल्यामुळे मुंबई शहरामधील भाडेकरु/रहिवाशी सदर संक्रमण शिबीरात स्थलांतर करण्यासाठी विरोध दर्शवितात.

(४) मंडळाच्या अखत्यारिमधील संक्रमण शिबीरांचे पुनर्विकासाचे प्रस्ताव विचाराधीन आहेत. अशा संक्रमण शिबिरांचा पुनर्विकास झाल्यावर भविष्यात आणखी संक्रमण गाळे उपलब्ध होतील.

(५) संक्रमण शिबीरातील घुसखोरी करणाऱ्यांवर म्हाडा अधिनियमातील तरतूदींनुसार कारवाई करण्यात येते.

तथापि, अशा अनधिकृत ताबा धारकांबाबत करावयाच्या कार्यवाहीची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कानजी कल्याणजी आणि कंपनी यांचे हेल्थ लायसन्स नुतनीकरणाबाबत**

**(२२) ११५२७१ (१९-०४-२०१८) श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कांदिवली (पश्चिम) येथील कानजी कल्याणजी आणि कंपनी ही कंपनी सन १९४९ पासून खाद्यतेलाचा व्यापार करीत असून सदर कंपनीने दिनांक २१ डिसेंबर, २०१२ रोजी आरोग्य अधिकारी आर/दक्षिण विभाग कांदिवली यांना कंपनीचे लायसन्स नुतनीकरण करण्यासाठी अर्ज केला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आरोग्य अधिकारी आर/दक्षिण विभाग यांनी संबंधित कंपनीला दिनांक २८ डिसेंबर, २०१२ रोजी पत्र लिहून सहाय्यक अभियंता, इमारत व कारखाने तसेच उपमुख्य अग्निशमन अधिकारी यांचेकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर नुतनीकरण करण्यात येईल असे कळविले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आरोग्य अधिकारी आर/दक्षिण विभाग यांनी लायसन्स नुतनीकरण फी रक्कम ३ लाख ८० हजार २४४ रुपये उशिरा (महसुलाच्या दृष्टीने) दिनांक २४ नोव्हेंबर, २०१४ रोजी स्वीकारली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर कंपनीकडून लायसन्स नुतनीकरण रक्कम न स्वीकारण्याचे नेमके कोणतेही कारण नसताना रक्कम उशिरा (महसुलाच्या दृष्टीने) स्वीकारली. (२०१३ आणि २०१४-लायसन्स फी रुपये ७० हजार ६५० + कम्पोझीशन फी रुपये ७० हजार ६५० + ट्रेड रीफुझल चार्ज रुपये २ लाख ३८ हजार ९४४) एकूण ३ लाख ८० हजार २४४ स्वीकारण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी जनप्रतिनिधींनी सह. महानगरपालिका आयुक्त आर/द यांना दिनांक २२ जून, २०१५ तसेच उपायुक्त आरोग्य विभाग महानगरपालिका यांना दिनांक ०७ जून, २०१७ व १३ सप्टेंबर, २०१७ व २९ सप्टेंबर, २०१७ रोजी पत्रे लिहिलेली आहेत, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, कंपनीची कोणतेही चूक नसताना प्रशासकीय दिरंगाईमुळे कंपनीकडून कम्पोझीशन फीपोटी रुपये ७० हजार ६५० एवढी रक्कम घेण्यात आली आहे व अतिरिक्त घेतलेली सदर रक्कम रुपये ७० हजार ६५० परत करावी अथवा पुढील नूतनीकरण (१ एप्रिल २०१८ पासून पुढे) समायोजित (ॲडजस्ट) करण्यात यावी, हे ही खरे आहे काय,
(७) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत अहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-१२-२०१८) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) मे. कानजी कल्याणजी आणि कंपनी यांनी आरोग्य विभागाच्या परवाना क्रमांक ७६१४४४२३५ चे दिनांक ०१.०१.२०१३ ते दिनांक ३१.१२.२०१३ पर्यंतच्या कालावधीसाठी नुतनीकरण करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे दिनांक २१.१२.२०१२ रोजी अर्ज केला होता.

तथापि, महानगरपालिकेच्या अग्निशमन विभाग व इमारत व कारखाने विभागाचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर सदर परवान्याचे नुतनीकरण करण्यात येईल असे मे. कानजी कल्याणजी आणि कंपनी यांना महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले.

तद्नंतर सदर कंपनीने आरोग्य व स्वच्छता विभागाशी संबंधित अटी व शर्तींची पूर्तता केल्यानंतर दिनांक २४.११.२०१४ रोजी सन २०१३-१४ या कालावधीसाठी विहित शुल्क व कम्पोजीशन शुल्क वसूल करुन परवाना क्रमांक ७६१४४४२३५ चे नुतनीकरण करण्यात आले.

(५) हे खरे आहे.

(६) सदर प्रकरणी मे. कानजी कल्याणजी आणि कंपनीला कम्पोजीशन फी चुकीची लावल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींचे पत्र बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झाले ही वस्तुस्थिती आहे.

(७) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी सुरु करण्यात येत असून, चौकशीअंती काढण्यात आलेल्या निष्कर्षानुसार पुढील कार्यवाही महानगरपालिकेमार्फत करण्यात येणार आहे.

---

## उल्हासनगर (जि.ठाणे) येथील सी.सी.टी.एस.-१३०२२ शीट नं. २८ या जागेवरील बोटींग तलाव विकसित करण्याबाबत

**(२३) ११५३७० (१२-०४-२०१८). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील सी.सी.टी.एस.-१३०२२ शीट नं. २८ या जागेवर होत असलेल्या अतिक्रमणामुळे स्थानिक प्रशासनाने बीओटी तत्वावर बोट क्लब विकसीत करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला परंतू जागेच्या मुल्यांकनाअभावी सदर काम प्रलंबित असल्याचे स्थानिक लोकप्रतीनिधिंनी शासनाच्या निदर्शनास आणून दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जागेचे मुल्यांकन करून मिळणेबाबतची पुढील कार्यवाही उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एक वर्षाचा कालावधी होऊनही संबंधित कार्यालयाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशीत करण्यात आली आहे काय, त्यानूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारण काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-१२-२०१८) :** (१) जागेच्या मूल्यांकनाअभावी बोटक्लब विकसित करण्याचे काम प्रलंबित असल्याचे स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २३०६.२०१६ व दिनांक १४.०३.२०१७ रोजीच्या पत्रांन्वये निदर्शनास आणून दिले आहे.

(२) हे खरे आहे.

(३), (४) व (५) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील सी.सी.टी.एस.-१३०२२ शीट नं. २८ या जागेचा मालकी हक्क उल्हासनगर महानगरपालिकेकडे करणेबाबत उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर यांचेकडे महानगरपालिकेमार्फत दिनांक २८ मार्च, २०१८ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

---

## माहुल (मुंबई) येथील महानगरपालिकेच्या ताब्यातील इमारतींमधील घरांची परस्पर विक्री झाल्याबाबत

**(२४) ११६५६९ (०३-०८-२०१८) श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील रस्ते, रेल्वे व अन्य विकास प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या झोपडपट्टी धारकांसाठी चेंबूरच्या माहूल परिसरातील महानगरपालिकेच्या ताब्यातील ४६ इमारतींमधील सुमारे २०० घरांची परस्पर विक्री पालिका अधिकाऱ्यांच्या संगनमताने बनावट दस्तऐवज करुन करण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी आरसीएफ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होऊन कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी नगरविकास विभागाने अधिक चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-१२-२०१८) :** (१) सदर प्रकरणी प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत तपासणी केली असता, २०० घरांची विक्री झाल्याची बाब खरी नसल्याचे आढळून आले आहे.

तथापि, सदर तपासणीत ११ घुसखोरांनी प्रत्यक्ष घुसखोरी केल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निदर्शनास आले आहे.

तसेच, "पालिकेच्या घरांची परस्पर विक्री" अशा आशयाची बातमी दिनांक २४.०१.२०१८ रोजीच्या वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती.

(२), (३) व (४) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे:-

- घुसखोरी केलेल्या १८ घुसखोरांना ताकीद देऊन आर.सी.एफ. पोलीस ठाण्याच्या मदतीने कारवाई करुन एकूण १८ सदनिका रिकाम्या करुन ताब्यात घेण्यात आल्या आहेत.

• बनावट कागदपत्रांच्या आधारे घुसखोरी करण्याच्या प्रयत्नात असलेल्या इसमांविरुध्द आर.सी.एफ. पोलीस ठाणे येथे दिनांक १३.११.२०१७, २७.११.२०१७ व २१.१२.२०१७ रोजी तक्रारी दाखल करण्यात आल्या असून, सदर प्रकरणी पोलीस तपास सुरु आहे.

---

**मुंबई महानगरपालिकेच्या विविध विभागांना लागणा-या**
**वस्तूंची खरेदी दुप्पट दराने केल्याबाबत**

**(२५) ११६८५० (२६-०७-२०१८). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या विविध विभागांना लागणारे फलक, लाकडाचे लहान डायनिंग टेबल, हात असलेल्या आणि नसलेल्या प्लास्टिकच्या खुर्च्या, टेबल, विद्यार्थ्यांसाठी लेखनासाठी फळी असलेली खुर्ची, पादत्राणे-बूट ठेवण्याची फडताळे खरेदी करण्याचा निर्णय महानगरपालिकेने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वस्तूंच्या खरेदीसाठी महानगरपालिकेच्या मध्यवर्ती खरेदी खात्याने अंदाजित केलेले दर हे बाजारभावापेक्षा दुप्पट असल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वस्तूंची खरेदी ही दुप्पट दराने असूनही मध्यवर्ती खात्याने याचे कंत्राट संबंधित कंत्राटदारांना देण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर वस्तूंची खरेदी ही जर बाजारभावापेक्षा जास्त दराने घेतली असेल तर त्यांची संपूर्ण चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनूसार शासनाने पूढे कोणता निर्णय घेतला आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-१२-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) अशा आशयाचे वृत्त दिनांक ०६.०४.२०१८ रोजीच्या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झाले होते. याबाबतची वस्तुस्थिती पुढीलप्रमाणे :-

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत ब्लॅक बोर्ड, नोटीस बोर्ड, प्लॅस्टीक चेअर्स इत्यादी १० बाबींसाठी ई-निविदा प्रक्रियेद्वारे दिनांक २८.०८.२०१७ रोजी निविदा मागविण्यात आली.

निविदा प्रक्रियेचे अंदाजपत्रक हे महानगरपालिकेच्या अस्तित्वात असलेल्या दरपरिपत्रकाप्रमाणे निश्चित केले जातात. यानुसार सदरील १० बाबींपैकी प्लॅस्टीक चेअर विथ आर्म्स व स्टुडंट चेअरर्स विथ राईटिंग पॅड या दोन बाबींकरीता विद्यमान दर परिपत्रक उपलब्ध असल्याने त्या बाबींचे दरपरिपत्रकातील दर जसेच्या तसे अंदाजित दरांसाठी विचारात घेतलेले आहेत.

ब्लॅक बोर्ड, नोटीस बोर्ड व डायनिंग चेअर्स  या तीन बाबींचे दर विद्यमान दरपत्रकामध्ये नमूद नसल्याने, तथापी या बाबींचे दर सन २०१४ ते २०१६ च्या दर परिपत्रकामध्ये उपलब्ध असल्याकारणाने त्याकरीता सदर बाबींच्या दरावर प्रतिवर्षी १०% वाढ गृहित धरुन त्यांची सरासरी काढून अंदाजित दर निश्चित करण्यात आले.

डायनिग टेबल स्मॉल वुडन, प्लॅस्टीक चेअर विदाऊट आर्म्स, प्लॅस्टीक स्टुल व आईस बॉक्स या चार बाबींचे दर विद्यमान तसेच मागील दर परिपत्रकात उपलब्ध नसल्याने त्या बाबींकरीता बाजार सर्वेक्षण करून अंदाजित दर निश्चित करण्यात आले आहेत.

शू रॅक या बाबींसाठी यापूर्वी माहे मे, २०१७ मध्ये मागविण्यात आलेल्या तथापी, जीएसटी शुल्क निर्धारीत झाले नसल्याने रद्द झालेल्या निवेदेतील लघुत्तम प्राप्त दर अंदाजित दरासाठी विचारात घेतलेले  आहेत.

सदर वस्तूंची खरेदी ही बाजारभावापेक्षा दुप्पट दराने असल्याची बाब वस्तुस्थितीत अनुसरुन नसून, प्रत्यक्षात वस्तुचे निविदेत प्राप्त दर हे निविदा अंदाजित दरापेक्षा कमी आहे, ज्या वस्तुंचे निविदा प्राप्त दर अंदाजित दरापेक्षा जास्त आहेत ते वाटाघाटी अंती कमी करण्यात आले आहेत. तसेच आईस बॉक्स या बाबींचे दर अंदाजित दरापेक्षा जास्त असल्याने सदर बाब निविदेतून वगळण्यात आली आहे.

सदर प्रकरणी मध्यवर्ती खरेदी खात्यामार्फत ई-निविदा प्रक्रियेद्वारे लघुत्तम देकार असणाऱ्या पुरवठादारांशी वाटाघाटीअंती प्राप्त झालेल्या दरास स्थायी समितीची दिनांक ०७.०४.२०१८ रोजी मान्यता प्राप्त झाली आहे. तद्नंतर दिनांक ०९.०५.२०१८ रोजी दर परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई शहरामध्ये लेप्टोस्पायरोसिसला आळा घालण्यासाठी**
**शहरातील तबेल्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(२६) ११७०१४ (२९-०७-२०१८) श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरामध्ये लेप्टोस्पायरोसिसला आळा आणण्यासाठी आरोग्य विभागाने शहरातील तबेल्यांवर कारवाईची मोहीम हाती घेतल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई शहरातील सर्व तबेल्यांवर कारवाई करुन शहराबाहेर काढण्याचे आदेश मा. उच्च न्यायालयाने सन २००८ मध्ये दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.न्यायालयाचे आदेश असतांनाही मुंबईमध्ये तबेले सुरु असण्याची नेमकी काय कारणे आहेत,

(४) असल्यास, तबेलेमालक तबेल्यांमध्ये अस्वच्छता ठेवणे, मृत जनावरे नाल्यामध्ये टाकणे, तसेच अनधिकृत जलजोडणी करत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मुंबईमध्ये किती तबेले सुरु आहेत तसेच सदर तबेले मा.न्यायालयाच्या आदेशानुसार कधीपर्यंत मुंबई बाहेर हलविण्यात येणार आहेत,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-१२-२०१८) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मुंबई महानगरपालिका क्षेत्रात लेप्टोस्पायरोसिसला आळा घालण्याच्या अनुषंगाने तबेलेधारकांविरुध्द मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३९४(१), ३८१, ४१२(अ), २७९, ३६८ व पोलीसांमार्फत कलम २६९, २७० भादंवि अन्वये कारवाई करण्यात आली आहे.
(२) मुंबई शहरातील सर्व तबेले शहराबाहेर हलविण्याचा निर्णय मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक १८.१२.२००८ अन्वये दिला आहे.
(३) मा.उच्च न्यायालयाच्या आदेशास दि बॉम्बे मिल्क प्रोडयुसर्स असोसिएशन या संघटनेने मा.सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिल्याने मा. न्यायालयाने सदर याचिका अंतिम निर्णयासाठी मा.उच्च न्यायालयाकडे वर्ग केली असून, सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(४) तबेल्यांमध्ये अस्वच्छता ठेवणे, मृत जनावरे नाल्यामध्ये टाकणे या कारणांसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत ४५० तबेल्यांवर मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३८१ अन्वये व तबेल्यांमध्ये अनधिकृत जलजोडणी याकरिता ३० तबेल्यांवर मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम २७९ अन्वये कारवाई करण्यात आली आहे.
(५) व (६) आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास यांचेकडून उपलब्ध माहितीनुसार, सन २००७ च्या सर्व्हेनुसार मुंबई व उपनगरांमध्ये ११३१ तबेले होते, त्यापैकी सुमारे ५०% तबेले सध्या सुरु आहेत.

मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर सदर तबेले मुंबईबाहेर हलविण्याची कार्यवाही तात्काळ करण्यात येणार असल्याचे आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास यांचेमार्फत कळविण्यात आले आहे.

---

## मुंबई शहर व उपनगरात असलेल्या फुटकळ भूखंडांचे (टीट-बीट लॅन्ड) वितरण अधिकार म्हाडा प्राधिकारणाकडून काढून घेतल्याबाबत

**(२७) ११७३६० (२३-०७-२०१८) श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरात असलेल्या म्हाडाच्या वसाहतीच्या परिसरातील छोटे छोटे फुटकळ (टीट-बीट लॅन्ड) भूखंड वितरित करण्याचे अधिकार म्हाडा प्राधिकरणाकडून काढून मा.गृहनिर्माण मंत्री यांनी स्वतःकडे घेऊन उक्त भूखंड वितरित करण्यासाठी समिती नेमली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भूखंड वितरित करण्याबाबत कोणते निकष आहेत व किती फूटकळ भूखंड वितरित करावयाचे आहेत याची यादी म्हाडाने उक्त समितीस दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यादीतील प्रस्तावाच्या अनुषंगाने समितीने कोणता निर्णय घेतला आहे वा त्यानुषंगाने निर्णयात्मक कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. प्रकाश महेता (२७-११-२०१८) :** (१) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम,१९७६ च्या कलम १६४ (१) मधील तरतूदीनुसार,"महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या अभिन्यासातील मूळ भूखंडाचे क्षेत्र ४००० चौ.मी.पर्यंत असल्यास त्यालगतच्या फुटकळ भूखंडाचे (Tit Bit Plot) वितरण म्हाडा प्राधिकरणाने करावेत तसेच, मूळ भूखंडाचे क्षेत्र ४००० चौ.मी. हून अधिक असल्यास त्यालगतच्या फुटकळ भूखंडाचे वितरण करण्याचे अधिकार म्हाडा अधिनियम १९८२ मधील विनियम १६ अन्वये गठित मंत्रीमंडळ उपसमितीस राहतील. असा दि.२३.०५.२०१८ च्या शासन निर्णयान्वये निर्णय घेण्यात आला आहे.
(२) व (३) शासनाने दि.१४.०७.२०१७ च्या परिपत्रकान्वये फूटकळ भूखंडाचे वाटप प्राधिकरण स्तरावरुन परस्पर न करता, यापूढे सर्व फुटकळ भूखंडाचे वाटप करण्याचे प्रस्ताव मंत्रीमंडळ उपसमितीच्या मान्यतेसाठी सादर करण्याच्या सुचना दिल्या होत्या. त्यानुसार म्हाडाकडून एकूण २५ प्रस्ताव मंत्रीमंडळ उपसमितीच्या मंजूरीकरिता सादर करण्यात आले होते. तथापि, दि.२३.०५.२०१८ च्या सुधारित शासन निर्णयाच्या अनुषंगाने सदरचे २५ प्रस्ताव, म्हाडाकडे परत पाठवून आवश्यक ते प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याबाबत महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई यांना सुचित केले आहे.

---

### वरळी (मुंबई) येथील ग्लोब मिल पॅसेज शाळा येथे वास्तव्य करणाऱ्या सेवानिवृत्त महानगरपालिका कामगारांना भुईभाडे आकारून राहण्यास मंजुरी देण्याबाबत

**(२८) ११७४२७ (२९-०७-२०१८) श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरळी (मुंबई) येथील ग्लोब मिल पॅसेज शाळा येथे वास्तव्य करणारे बहुतांश रहिवासी हे मुंबई महानगरपालिकेचे कामगार असून सन १९८० मध्ये वा त्या दरम्यान सदर ठिकाणी गुन्हेगारी प्रवृत्तीची माणसे तसेच माथेफिरू यांचा कब्जा असल्याने तत्कालीन महानगरपालिका प्रशासनातर्फे सदरहू ठिकाणी कामगारांना घरे बांधण्यास विविध प्रकारे परवानग्या देण्यात आल्या होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कामगारांना भुईभाडे आकारण्यात आले असून आजमितीपर्यंत सदरहू भुईभाडे हे कामगार भरत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, येथील काही कामगार सेवानिवृत्त होवूनही वास्तव्य करीत असल्याने त्यांना आजतागायत सेवानिवृत्तीचे लाभ देण्यात आलेले नसल्याने या कामगारांच्या कुटुंबियांवर उपासमारीची वेळ आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या सेवानिवृत्त कामगारांना ही घरे रिक्त करण्यास सांगितले असल्याने हे कामगार बांधव हवालदिल झाले आहेत,

(५) असल्यास, ग्लोब मिल पॅसेज शाळा येथे वास्तव्य करणारे कामगार सन १९९५ च्या पूर्वीपासून या ठिकाणी राहत असल्याने त्यांना कायमस्वरूपी भुईभाडे आकारून तेथे राहण्यास मंजुरी तसेच त्यांना तातडीने सेवानिवृत्तीचे सर्व लाभ देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-१२-२०१८) :** (१) वरळी येथील ग्लोब मिल शाळा परिसरात महापालिका कर्मचारी वास्तव्यास असलेला भूभाग बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियोजन आराखडा १९६७ मध्ये महानगरपालिका किरकोळ मंडई व महानगरपालिका प्राथमिक शाळा या कारणांसाठी आरक्षित होता.

तद्नंतर सदर भूभाग विकास नियोजन आराखडा १९९१ मध्ये मनोरंजन मैदान, महानगरपालिका प्राथमिक शाळा व किरकोळ मंडई आणि घरे या कारणांसाठी आरक्षित असून, सदर आरक्षित भूभागावर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या काही कर्मचाऱ्यांनी अतिक्रमण करुन घरे बांधली आहेत.

सदर रहिवाशी बृहन्मुंबई महानगरपालिकेचे कर्मचारी असून, सदर भूभागावर घरे बांधण्यासाठी त्यांना कोणत्याही प्रकारची परवानगी देण्यात आलेली नसल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(२) सदर भूभागावर राहत असलेल्या एकूण १२ कर्मचाऱ्यांकडून महानगरपालिकेमार्फत किरकोळ भुईभाडे आकारणी केली जाते.

सदर भुईभाडयाची रक्कम अत्यल्प असून, त्यांच्या वेतनामधून आजपर्यंत घरभाडे रक्कम (HRA) वजा करण्यात आलेली नाही.

(३) व (४) सदर १२ कर्मचाऱ्यांपैकी ४ कर्मचाऱ्यांनी सेवानिवृत्तीनंतर रितसर जागेचा ताबा सोडला असून, ६ कर्मचाऱ्यांनी सेवानिवृत्तीनंतरही जागेचा ताबा सोडलेला नाही व २ कर्मचारी सध्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत कार्यरत आहेत.

(५) व (६) ग्लोब मिल पॅसेज शाळा येथे वास्तव्य करणारे कामगार यांना कायमस्वरुपी भुईभाडे आकारुन तेथे राहण्यास मंजुरी देणेबाबत कोणतेही धोरण नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दिनांक ३०.१०.२०१० रोजीच्या परिपत्रकानुसार, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना प्रथम तीन महिन्यांपर्यंत निवासी जागा ठेवण्याची परवानगी देण्यात आली आहे.

सेवानिवृत्तीनंतर जागेचा ताबा न सोडलेल्या ६ कर्मचाऱ्यांपैकी ५ कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे दावे प्रलंबित ठेवण्यात आले आहेत. तसेच, एका कर्मचाऱ्याला मंजूर करण्यात आलेले निवृत्ती वेतनाचे लाभ रोखून ठेवण्याबाबतची पुढील कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

---

### ओसी न मिळालेल्या इमारतीतील ग्राहकाने खरेदी केलेल्या सदनिकांबाबत महारेराने दिलेला निर्णय राज्यात लागू होण्याबाबत

**(२९) ११८३६८ (२३-०७-२०१८). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.जयकुमार गोरे (माण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.सुनिल केदार (सावनेर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इमारतीला ओसी मिळाली नसेल आणि त्या इमारतीत सदनिका खरेदी केलेल्या ग्राहकाने घराचा ताबा घेतला नसेल तर विकासक त्या ग्राहकाकडून देखभाल खर्च घेऊ शकत नसल्याचा निकाल महारेरा प्राधिकरणाने दिला असल्याचे दिनांक २० एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महारेराच्या या निर्णयामुळे ग्राहकांना दिलासा मिळाला आहे तरी हा निर्णय संपूर्ण राज्यात लागू होण्याबाबत शासन आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१५-१२-२०१८) :** (१) खरे आहे.

महारेरा तर्फे दिनांक २३ मे, २०१८ रोजी एका सुनावणी दरम्यान असा निकाल दिला आहे.

(२) सदर आदेशास अनुसरुन विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेऊन आवश्यकता असल्यास याबाबत शासन स्तरावरुन आदेश निर्गमित करण्यात येतील.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### चेंबूर (मुंबई) येथील जलतरण तलाव सुरु करण्याबाबत

**(३०) ११९८१२ (२३-०७-२०१८) श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चेंबूर (मुंबई) येथील जलतरण तलावाच्या नुतनीकरणाचे काम माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान पूर्ण होऊनही हा जलतरण तलाव अद्यापही सुरु करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जलतरण तलावास मुंबई महानगरपालिकेच्या जल अभियंता विभागाने पाणी पुरवठा करण्यास नकार दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे या जलतरण तलावावर करण्यात आलेला १९ कोटी रुपयांचा खर्च वाया गेला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरील जलतरण तलाव सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-१२-२०१८) :** (१) चेंबूर येथील जलतरण तलावाच्या नुतनीकरणाची ९८ टक्के कामे माहे जानेवारी २०१८ मध्ये पूर्ण झालेली आहेत.

सद्य:स्थितीत तलावाची चाचणी प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून, जल प्रक्रियेची कामे महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहेत.
(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जल अभियंता विभागाकडून जलतरण तलावाकरीता जल जोडणी देण्यात आलेली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुर्ला (मुंबई उपनगर) भागातील अतिधोकादायक इमारतींमधील रहिवाशांना स्थलांतरित करण्याबाबत**

**(३१) ११९९०९ (२९-०७-२०१८). श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेने ६१९ अतिधोकादायक इमारतींची यादी तयार केली असून सर्वाधिक अतिधोकादायक इमारती कुर्ला भागात असून या इमारतींची संख्या ११० असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू अतिधोकादायक इमारतींमधील रहिवाशांना स्थलांतरित करण्याबाबत महानगरपालिका प्रशासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-१२-२०१८) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत महानगरपालिका क्षेत्रातील अतिधोकादायक व मोडकळीस आलेल्या इमारतींचे पावसाळ्यापूर्वी सर्वेक्षण करण्यात येते.

त्यानुसार दिनांक १५ मे, २०१८ पर्यंत महानगरपालिकेस प्राप्त अहवालानुसार, सी-१ प्रवर्गामधील अतिधोकादायक व मोडकळीस आलेल्या एकूण ६१९ इमारती असून, कुर्ला भागात ११० अतिधोकादायक इमारती असल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेची मालकी असलेल्या इमारतीमधील भाडेकरु/रहिवासी/कर्मचारी यांचे महानगरपालिकेमार्फत इतरत्र स्थलांतर करण्यात येते.

खाजगी इमारतीमधील रहिवाशांच्या स्थलांतराची जबाबदारी खाजगी इमारत मालकाची आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील दावा क्रमांक ११३५/२०१४ मधील मार्गदर्शक तत्वानुसार, महानगरपालिकेच्या एल विभागातील अतिधोकादायक इमारती रिक्त करण्यासाठी भोगवटादारांना नोटीस देणे, त्यांची जलजोडणी व विद्युत जोडणी खंडीत करणे इत्यादी कारवाई करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेमध्ये बाकडे खरेदीत झालेला गैरव्यवहार**

**(३२) १२१३८० (२९-०७-२०१८) श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कुलाबा परिसरामध्ये दोन वेगवेगळया ठिकाणी एकूण १६ व्हीआयपी बाकडे बसविण्याचा निर्णय मुंबई महानगरपालिकेने घेतला असून त्यासाठी तब्बल ५ लाख १० हजार ८०० रुपये खर्च करण्यात येणार असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाजारात ८ ते १० हजार रुपयांमध्ये मिळणारे एक बाकडे सुमारे ३२ हजार रुपयांना खरेदी करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरहू खरेदीमध्ये गैरव्यवहार झाला असून याबाबत चौकशी करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार व्हीआयपी बाकड्यांसाठी महानगरपालिकेचा दुप्पट खर्च करणा-या अधिका-यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे व सदरहू खरेदी प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-१२-२०१८) :** (१) व (२) स्थानिक नगरसेविका यांच्या मागणीनुसार कुलाबा परिसरातील प्रभाग क्र. २२५ मध्ये १६ व्हीआयपी बाकडे दोन वेगवेगळया ठिकाणी बसविण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत अधिकृत दरसूची यु.एस.आर. २०१३ च्या आधारे प्रस्तावित करण्यात आले होते.

पंरतु महानगरपालिकेची यु.एस.आर. २०१८ ही नवीन दरसूची आल्याने सदर खरेदी प्रक्रिया रद्द करण्यात आल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) सदर खरेदी प्रक्रिया रद्द करण्यात आली असल्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आलेली नाही.

---

**अकोला येथील रामदासपेठ पोलिस ठाण्यालगत असलेल्या**
**मातानगरात सिलिंडरचा स्फोट झाल्याबाबत**

**(३३) १२२२१४ (२३-०७-२०१८). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला येथील रामदासपेठ पोलिस ठाण्यालगत असलेल्या मातानगरात सिलिंडरच्या स्फोटामुळे एकूण ५७ घरे जळून खाक झाली असून येथील नुकसानग्रस्तांच्या २४४ घरांचा प्रस्ताव शासनाच्या नगरविकास मंत्रालयाकडे अभिप्रायासाठी माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान पाठविण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे. महानगरपालिकेकडील दिनांक ०३.०७.२०१८ रोजीच्या पत्रान्वये सदर प्रस्ताव संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य यांचे मार्फत सादर केलेला आहे.

(२) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, यांचे अभिप्राय शासनास प्राप्त होणेचे आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर शहरातील राजभवनाच्या सुरक्षितेबाबत**

**(३४) १२२५८४ (२९-०७-२०१८). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील राजभवनाच्या आंतरिक व बाह्य सुरक्षेची विविध विभागाच्या अधिकाऱ्यांनी पाहणी केली असता ती सुरक्षेचा दृष्टीने धोकादायक असल्याबाबतची गंभीर बाब माहे मार्च, २०१८ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राजभवनाच्या पाहणी अहवालातून दक्षिणेकडे बिजलीनगर भागात सुरक्षा भिंतीलगत कापडी पाल टाकलेल्या झोपडया, खाटीकपुरा भागात राजभवनाच्या टॉवर ११ व १२ समोर सरंक्षक भिंतीलगत रहिवाशांची पक्की घरे, महानगरपालिकेच्या नगर भूमापनाचे बंद पडलले कार्यालय, मुस्लीम लायब्ररी आदीचे बांधकाम संरक्षण भिंतीपर्यंत पसरलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राजभवनाच्या सुरक्षा भिंतीलगत बांधलेले महानगरपालिकेचे सार्वजनिक शौचालय, पूर्वेकडे काटोलकडे जाणाऱ्या मार्गावर हनुमान मंदीराच्या पुजाऱ्याने अतिक्रमण केले असुन त्या जागेवरून कुणालाही राजभवनात ये-जा करणे शक्य आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राजभवनाच्या परीसरात वाढलेले अतिक्रमण हटविण्याकरीता संबंधित विभागाकडुन तातडीची कार्यवाही करण्यात आली आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-१२-२०१८) :** (१) संवेदनशील ठिकाणाचे सुरक्षा सर्वेक्षण ही नित्याची बाब असून, त्यानुसार आवश्यक ती पोलीस सुरक्षा पुरविण्यात आलेली असल्याचे, गृह विभागाच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

(२) सदरची बाब खरी असून, त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत, नागपूर पोलीस विभागाने, जिल्हाधिकारी नागपूर, आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांना कळविण्यात आले असल्याचे, गृह विभागाच्या अहवालात नमूद करण्यात आलेले आहे.

(३), (४) व (५) • राजभवनाच्या सुरक्षा भिंतीलगतचे महानगरपालिकेचे सार्वजनिक शौचालय दिनांक १३/०६/२०१८ रोजी तोडण्यात आलेले आहे.

• राजभवन टॉवर ११ व १२ च्या भिंतीलगत असलेल्या रहिवाशांची जागा शासनाची असून, ती लिजवर दिलेली असल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येते. राजभवन सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर सदरचे लिज समाप्त करण्याची बाब जिल्हाधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिल्याचे आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांच्या अहवालात नमूद करण्यात आलेले आहे.

• जमाबंदी दस्तऐवजानुसार काटोल रोड येथील शासकीय मालकीच्या जागेवर असलेले हनुमान मंदिराबाबतचे प्रकरण मा.न्यायालयात याचिका क्रमांक आर.सी.एस.८६८/२००६ प्रलंबित असून, यामध्ये मा.न्यायालयाने दिनांक ०२/०७/२०१७ च्या आदेशानुसार स्थगिती दिलेली आहे.

• महानगरपालिकेकडून दिनांक १३/०६/२०१८ व दिनांक १८/०६/२०१८ रोजी या परिसरातील अस्थायी झोपड्या काढून टाकण्यात आलेल्या आहेत. तसेच या परिसरात कोणत्याही प्रकारची अतिक्रमणे होणार नाहीत याबाबत महापालिका दक्षता घेत आहे.

---

## रबाळे एमआयडीसी पोलिस ठाण्याजवळील शिवाजी फ्लोअर मिलकडून ऐरोली टी जंक्शनकडे येण्यासाठी भुयारी मार्ग बांधण्याबाबत

**(३५) १२६९११ (०५-१२-२०१८). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे-बेलापूर मार्गावरील रबाळे येथील वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी रबाळे एमआयडीसी पोलिस ठाण्याजवळील शिवाजी फ्लोअर मिलकडून ऐरोली टी जंक्शनकडे येण्यासाठी भुयारी मार्ग बांधण्याच्या प्रस्तावावर नवी मुंबई महानगरपालिका स्तरावर सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झालेली आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चाकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०१-२०१९)** : (१) • ठाणे-बेलापूर रस्त्यावरील शिवाजी फ्लोअर मिलकडून ऐरोली टी-जंक्शनकडे जाण्यासाठी भूयारी मार्ग बांधण्यासाठी दि.२२.०२.२०१७ च्या ठरावान्वये नवी मुंबई महानगरपालिकेने मंजूरी दिलेली आहे.

• सदर प्रकरणी निविदा प्रक्रिया पूर्ण करून कंत्राटदारास दि.१०.०८.२०१८ रोजी कार्यादेश देण्यात आले.

• सदर काम करताना होणारी वाहतुक कोंडी टाळणेसाठी वाहतुकीचे नियोजन करणेसाठी नवी मुंबई वाहतुक शाखेस परवानगी देण्याची विनंती केली आहे.

• सदर कामाच्या ठिकाणी एमआयडीसीची ९०० व ६०० मीमी व्यासाच्या पाण्याच्या २ जलवाहिन्या असून नागरिकांना पाण्याचा त्रास न होता जलवाहिनी व इतर सर्व्हिस युटीलीटी स्थलांतरीत करून वाहतुक विभागाकडून परवानगी मिळताच प्रत्यक्ष कामास सुरूवात करण्यात येईल, असे नवी मुंबई महानगरनरपालिकेने कळविले आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विटा (जि.सांगली) येथील नेहरुनगरमध्ये नगरपरिषदेने बांधलेल्या मटण मार्केटचे सांडपाणी उघडयावर सोडण्यात येत असल्याबाबत**

**(३६) १२७०४६ (०५-१२-२०१८). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विटा (जि.सांगली) येथील मध्यवर्ती ठिकाणी असणा-या नेहरुनगरमध्ये नगरपरिषदेने बांधलेल्या मटण मार्केटचे सांडपाणी उघडयावर सांडू नये, त्याची योग्य ती व्यवस्था करावी अन्यथा बेमुदत आंदोलन करण्याचा इशारा तेथील नागरिकांनी दिनांक २५ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्या सुमारास प्रांतअधिकारी यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१२-२०१८)** : (१) होय.

(२) व (३) • तासगाव रोडवरील खुल्या गटारीत मटन मार्केटचे सांडपाणी सोडू नये, अशी नागरिकांची मागणी आहे. सबब, आधी सदर गटार बंदिस्त करण्याचे काम नगरपरिषदेकडून करण्यात येत आहे.

• मटन मार्केटचे काम अपूर्णावस्थेत असून मटन मार्केट अद्याप प्रत्यक्षात सुरु करण्यात आलेले नाही.

• वरीलप्रमाणे बंदिस्त गटारीचे काम पूर्ण झाल्यानंतरच मटन मार्केट सुरु करण्यात येईल, असे नगरपरिषदेने कळविले आहे.

---

## औरंगाबाद येथील समांतर जलवाहिनीच्या प्रकल्पाबाबत

**(३७)१२७२२६ (०६-१२-२०१८) श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील समांतर जलवाहिनीच्या ३०० कोटी रुपयांच्या योजनेला महानगरपालिकेने माहे ऑगस्ट, २००६ मध्ये वा त्या दरम्यान मंजुरी दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्यस्थितीमध्ये सदरची योजना १ हजार कोटी रुपयांवर पोहचलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ३०० कोटी रुपयांची योजना १ हजार कोटी रुपयांवर पोहचण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले, त्यानूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-१२-२०१८) :** (१), (२), (३), (४) व (५) • औरंगाबाद शहर वाढीव पाणीपुरवठा या रु.३५९.६७ कोटी किमतीच्या योजनेला केंद्र शासन पुरस्कृत UIDSSMT योजनेतून जून,२००९ मध्ये मान्यता मिळाली आहे.

• सन २००५-०६ च्या दरसुचीनुसार रु.३५९.६७ कोटीच्या प्रस्तावाला सन २००९ मध्ये मान्यता मिळाल्याने तसेच व्याप्तीमध्ये वाढ करुन योजना PPP तत्वावर राबविण्याचा निर्णय औरंगाबाद महापालिकेने घेतला.

• त्यानुसार योजनेची किंमत रु.७९२.२० कोटी होती. डिसेंबर,२०१० मध्ये सदर प्रकल्पाची निविदा अंतिम होऊन सन २०११ मध्ये कन्सेशन ॲग्रीमेंट झाले.

• तथापि, कन्सेशनर यांनी फायनान्शीयल क्लोजर व माईल स्टोननुसार कामे न केल्यामुळे व करारनाम्यातील अटी व शर्तीमध्ये अनियमितता केल्यामुळे दि.०१.१०.२०१६ रोजी संबधित सवलत धारकास टर्मिनेशनची नोटीस दिली आहे. त्यानंतर सदर योजनेचे संचलन व देखभाल दुरुस्ती औरंगाबाद महापालिकेमार्फत करण्यात येत आहे.

• सद्यस्थितीत सदर प्रकरण सर्वोच्च न्यायालय व आर्बिट्रेशन अंतर्गत आहे.

---

## औरंगाबाद शहरातील भूमिगत गटार योजनेबाबत

**(३८) १२७३५२ (०६-१२-२०१८). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरात ५४४ किलोमिटर लांबीच्या भूमिगत गटार योजनेचे काम ८८ टक्के पूर्ण झाले असून निधी मिळत नसल्याचे कारण देत गत चार महिन्यांपासून कंत्राटदार गायब झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुढील दहा वर्षे योजना कार्यान्वित झाल्यानंतर कंत्राटदाराला काम करणे बंधनकारक असल्याचा करार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-१२-२०१८) :** (१), (२), (३) व (४) • केंद्र शासन पुरस्कृत युआयडीएसएसएमटी योजने अंतर्गत डिसेंबर, २०१३ मध्ये औरंगाबाद शहर भूमिगत गटार योजना मंजूर आहे.
• सदर प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेअंती जुलै, २०१४ मध्ये कामाचे कार्यादेश देण्यात आले आहेत.
• निविदेचा भाग असलेले ऑपरेशन आणि मेंटेनन्सचे काम पुढील १० वर्ष याच कंत्राटदारास करणे बंधनकारक आहे. जल नि:सारणवाहीनी नादुरस्त झाल्याची तक्रार आल्यास कंत्राटदाराकडून दुरुस्तीचे काम करुन घेतले जाते.
• पुर्ण झालेल्या STP/SPS दैनंदिन देखभाल दुरुस्तीचे काम निविदेतील अटी व शर्तीनुसार कंत्राटदार नियमितपणे करीत असल्याबाबत औरंगाबाद महानगर पालिकेने कळविले आहे.
• या योजनेचे काम ८८% पूर्ण झाल्याचा अहवाल औरंगाबाद महानगरपालिकेने सादर केला आहे.

---

**मीरा रोड (जि.ठाणे) हाटकेश भागातील ग्रीनवूड गृहसंकुलातील स्टर्लिंग कोर्ट इमारतीला तडे गेल्याबाबत**

**(३९) १२७५०० (०६-१२-२०१८) श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मीरा रोड (जि.ठाणे) हाटकेश भागात सन २००२ मध्ये उभारण्यात आलेल्या सात इमारतीच्या ग्रीनवूड गृहसंकुलातील स्टर्लिंग कोर्ट इमारतीला दिनांक २८ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्या सुमारास तडे गेल्यामुळे स्ट्रक्चरल ऑडिट करुन ८२ बेघर झालेल्या कुटुंबियांना एमएमआरडीच्या सदनिकांमध्ये स्थालांतरित करण्याचे आदेश मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या आयुक्तांनी दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर संकुलाला लागूनच लोढा ग्रुपमार्फत होणाऱ्या बांधकामाच्या पायलिंगचे काम सुरु असल्याने ग्रीन वूड संकुलाला हादरे बसत असल्याचे आणि त्यातून इमारतीला धोका निर्माण झाला असल्याची तक्रार सोसायटीने तीन महिन्यांपूर्वी आयुक्त, मीरा भाईंदर महानगरपालिका, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, काशीमीरा पोलीस ठाणे यांच्याकडे केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी करण्यात आली आहे काय, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार संबंधितांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०१-२०१९) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) • मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील हाटकेश भागात सन २००२ मध्ये उभारण्यात आलेल्या ग्रीनवूड गृहसंकुलातील स्टर्लिंग कोर्ट इमारतीला तडे गेले असल्याचे निदर्शनास आल्यानंतर दि. २८.०८.२०१८ रोजी महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने घटनास्थळी जाऊन सदर इमारत रिकामी केली. तेथील रहिवाश्यांना महानगरपालिकेच्या संक्रमण शिबीरातील सदनिकांमध्ये स्थलांतरीत करण्यात आलेले आहे.

• महानगरपालिकेने संबंधीत विकासक मे. बेलीसिमो महावीर असोसिएट्स डेव्हलपर्स प्रा. लि. यांना पायलिंगचे कामासाठी स्थगिती आदेश देण्यात आलेले आहेत.

• महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या पॅनलवरील स्ट्रक्चरल इंजिनिअर व आय. आय. टी., पवई यांचेमार्फत संरचनात्मक तपासणी करून सदर इमारतीचा अहवाल प्राप्त केलेला आहे.

• सदर अहवालामध्ये चारही इमारती धोकादायक असल्याचे निष्पन्न झाल्याने सदरील इमारती धोकादायक घोषित करण्यात आलेल्या आहेत.

• सदरच्या इमारतीचे विकासकांमार्फत पुनर्बांधणी करणेबाबत बैठका घेतल्या असून पुनर्विकासाबाबतचा प्रस्ताव विकासकामार्फत महानगरपालिकेस सादर करणेची कार्यवाही सुरू असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर सुधार प्रन्यासच्या मालकीची जागा नियमात बदल करुन ज्येष्ठ पशुवैध प्रतिष्ठानला देण्यात आल्याबाबत**

**(४०) १२७८९७ (०६-१२-२०१८) श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने नागपूर सुधार प्रन्यासच्या मालकीची असलेली करोडो रूपयांची जमीन मौजा भामटी खसरा क्रमांक ८९/१, ८९/१, ९०/१ दी प्रोसेस सर्व्हर को ऑप हाऊसींग सोसायटी अभिन्यातील क्षेत्र १०५४.१० चौ.मी. आणि मौजा भामटी खसरा क्रंमाक ८६ स्वालंबीनगर को ऑप हाऊसींग सोसायटी अभिन्यातील ९३३.१० चौ.मी. एकूण क्षेत्र १९८७.२० चौ.मी.या व्हेटरनरी हॉस्पिटलकरिता राखीव असलेल्या दोन्ही जागा नागपुर सुधार प्रन्यासच्या नियमात बदल करून विना निविदा थेट ज्येष्ठ पशुवैध प्रतिष्ठानला देण्यात आल्याची माहिती माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर शहरात असलेल्या या मोक्याच्या जमिनीची किंमत करोडो रूपयांची असल्याने शासनाचे ५० कोटी रुपयांच्या वर नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, व्हेटरनरी हॉस्पिटलकरिता राखीव असलेल्या दोन्ही जागा नागपुर सुधार प्रन्यासच्या नियमात बदल करून ज्येष्ठ पशुवैध प्रतिष्ठानला देण्याची कारणे काय तसेच किती रक्कम आकारून व कोणते नियम आकारुन सदर जमिन देण्यात आली आहे व त्याचा तपशिल काय आहे,
(४) असल्यास, सदर जमिनीचे नियमबाहय वाटप करण्यात आल्याप्रकरणी संबधितांवर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही. सभापती, नागपूर सुधार प्रन्यास यांचेकडून प्राप्त प्रस्तावाच्या आधारे, मौजा भामटी (परसोडी) येथील ख.क्र.८९/१, ९०/१ व ९१/१ ह्या दि.प्रोसेस सर्व्हर कॉ.ऑप.सोसायटी, नागपूर या संस्थेच्या अभिन्यासातील १०५४.१० चौ.मी. आणि मौजा भामटी, ख.क्र.८६, स्वावलंबीनगर कौ.ऑप हौसिंग सोसायटी अभिन्यासातील ९३३.१० चौ.मी. (एकूण क्षेत्र १९८७.२० चौ.मी.) या व्हेटरनरी हॉस्पीटलकरिता आरक्षित असलेल्या दोन्ही जागा "व्हेटरनरी हॉस्पीटल, गोसेवा केंद्र, संशोधन व प्रशिक्षण केंद्र, पशुसंवर्धन विषयक प्रशिक्षण वर्ग इ. चालविण्यासाठी" ज्येष्ठ पशुवैद्य प्रतिष्ठान, नागपूर या संस्थेला हस्तांतरीत करण्याच्या अनुषंगाने नागपूर सुधार प्रन्यास जमीन विनियोग नियम, १९८३ मधील तरतुदीनुसार शासनाने निर्णय घेतला आहे.
(२) हे खरे नाही.
(३) (४) व (५) उपरोक्त प्रमाणे वस्तुस्थिती असल्याने, यासाठी नागपूर सुधार प्रन्यासच्या नियमात बदल करण्यात आला आहे ही बाब खरी नसून, सदरहू जमीन अद्याप संबंधीत संस्थेला वाटप झालेली नसल्याने, पुढील कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**शहरातील संगम चौक ते जिल्हा सामान्य रुग्णालय हा रस्ता नादुरुस्त झाल्याबाबत**

**(४१) १२८०४७ (०६-१२-२०१८) श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा नगरपरिषदेच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे बुलढाणा शहरातील संगम चौक ते जिल्हा सामान्य रुग्णालय हा रस्ता खड्डेमय झाला असून वाहतुकीस अयोग्य असल्याचे दिनांक ६ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, बुलढाणा नगरपरिषद हद्दीतील संगम चौक ते जिल्हा सामान्य रुग्णालय हा रस्ता तातडीने नूतनीकरण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१२-२०१८) :** (१) मुख्याधिकारी, नगर परिषद बुलढाणा व प्र.नगर अभियंता यांनी केलेल्या तपासणीत सदर रस्ता अंशत: नादुरुस्त असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे.

(२) व (३) • बुलढाणा शहरातील संगम चौक ते जिल्हा रुग्णालयाकडे जाणाऱ्या रस्त्यालगत सांडपाणी वाहून जाण्यासाठी व्यवस्था नसल्यामुळे रस्त्यावर पावसाचे पाणी साचून राहते. तसेच सदर रस्त्यावर सातत्याने जड वाहतूक होत असल्यामुळे या रस्त्याचा डांबरी पृष्ठभाग अंशत: नादुरुस्त झालेला आहे, हे खरे आहे.

• बुलढाणा नगरपरिषदेकरीता सन २०१७-१८ करीता "विशेष रस्ता अनुदान" रुपये १ कोटी तर सन २०१८-१९ साठी "सर्वसाधारण रस्ता अनुदान" रुपये ५० लाख एवढा निधी शासनाने मंजूर केला आहे.

• सदर रस्त्याचे बाजूने सांडपाणी / पावसाचे पाणी वाहून जाण्याच्या व्यवस्थेसह रस्त्यांचे नुतनीकरणाचे कामाचा प्रस्ताव मंजूरीसाठी आगामी सर्वसाधारण सभेमध्ये ठेवण्यात येईल व त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे नगरपरिषदेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक शहरातील मागण्यांबाबत

**(४२) १२८३२६ (०६-१२-२०१८) श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील झोपडपट्टयांना नागरी सुविधा पुरवून त्या अधिकृत म्हणून घोषीत करण्यात याव्यात, जवाहरलाल नेहरू नागरी पुनरुत्थान किंवा प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरकूल योजना राबवावी, शहीद भगतसिंग कॉलीनी (सिडको) येथील बांधण्यात आलेल्या घरकुलांचे काम निकृष्ठ दर्जाचे झाले असून त्याची चौकशी करावी व घटस्फोटीत व विधवा महिलांना देखील घरकूल योजनेचा लाभ मिळावा इत्यादी मागण्यांसाठी दिनांक १२ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास एका राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांनी नाशिक महानगरपालिकेच्या आयुक्तांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनातील मागण्यांवर कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-१२-२०१८) :** (१) व (२) होय.

नाशिक महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या निवेदनास अनुसरुन खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

• नाशिक महानगरपालिका क्षेत्रात एकूण १५७ झोपडपट्ट्या असून, त्यापैकी ५७ झोपडपट्ट्या घोषित करण्यात आल्या आहेत. उर्वरित झोपडपट्ट्या घोषित करण्याबाबत नियमानुसार

प्रस्तावित आहे.

• सर्व झोपडपट्ट्यांना महानगरपालिकेमार्फत मुलभूत सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत.

• जवाहरलाल नेहरू नागरी पुनरुत्थान अभियान अंतर्गत नाशिक महानगरपालिका क्षेत्रात एकूण ७४६० घरकुलांचे बांधकाम करण्यात आले असून, ६७८२ घरकुलांचे वाटप करण्यात आले आहे. उर्वरित ६७८ घरकुलांचे वाटप करण्याचे प्रस्तावित आहे.

• प्रधानमंत्री आवास योजनेची अंमलबजावणी करण्यात येत असून, झोपडपट्टी निहाय सर्वेक्षण व मागणी सर्वेक्षण कार्यवाही करण्यात आली आहे.

• शहिद भगतसिंग नगर येथील झोपडीधारकांना घरकुलांचे वाटप करण्यात आले असून, यामध्ये घटस्फोटीत व विधवा महिलांना लाभ देण्यात आलेला आहे.

• घरकुलांची कामे सुरु असतांना त्रयस्थ संस्थेमार्फत बांधकाम व गुणवत्ता तपासणी वेळोवेळी करण्यात आलेली असल्याने निकृष्ट दर्जाचे काम झालेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगांव (ता.मालेगांव, जि.नाशिक) शहरातील रस्त्यांची झालेली दूरवस्था**

**(४३) १२८७०३ (०६-१२-२०१८). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (ता.मालेगांव, जि.नाशिक) शहरातील कॅम्परोड, मोसमपूल ते टेहरे चौफुली, कॉलेज स्टॉप ते रावळगाव नाका, मोसमपूल ते रामसेतू या महत्वाच्या रस्त्यांसह इतर रस्त्यांवर मोठया प्रमाणात खड्डे पडले असल्याचे दिनांक २४ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाकडून मात्र रस्ता दुरुस्तीकडे दुर्लक्ष केले गेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले व तद्नूसार मालेगांव शहरातील रस्ते दुरुस्त करणेबाबत तसेच वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्याच्या दृष्टीने शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-१२-२०१८) :** (१) मालेगाव महानगरपालिका क्षेत्रातील कॅम्प रोड, मोसमपूल ते टेहरे चौफुली, कॉलेज स्टॉप ते रावळगाव नाका हे तीनही मुख्य रस्ते शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून रस्ता दुभाजकासह नव्याने करण्याचे प्रस्तावित आहे.

त्यापैकी कॅम्प रोडवरील दुभाजकाचे काम पुर्ण करण्यात आले आहे. तसेच मोसमपूल ते टेहरे चौफुली पर्यंतचे भागश: काम पुर्ण करण्यात आले असून, कॉलेज स्टॉप ते रावळगाव नाका पर्यंतचा रस्ता नव्याने करण्यात आलेला आहे.

मोसमपूल ते रामसेतू पुल या रस्त्याची दुरुस्ती महानगरपालिकेमार्फत करण्यात

आली आहे.
(२) व (३) महानगरपालिकेने सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात रस्ते दुरुस्तीसाठी रु.१.६० कोटी रकमेची तरतूद केली असून, शहरातील मुख्य मार्ग दुरुस्ती करण्याची वार्षिक निविदा मंजूर केली आहे.

महानगरपालिकेने शहरातील मुख्य रस्ते सुस्थितीत ठेवण्याची दक्षता घेतली असून, उक्त रस्त्यांवरील खड्डे दुरुस्ती तातडीने करुन घेण्यात आलेली आहे.

तसेच, महानगरपालिका क्षेत्रातील मुख्य रस्त्यांवरील वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी रस्ता दुभाजक करण्यात येत असून, रस्त्यावरील अतिक्रमण काढण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

महानगरपालिकेने रस्ते दुरुस्त करणेबाबत तसेच वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्याच्या दृष्टीने कार्यवाही केली असल्याने चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक महानगरपालिकेत लाखो रुपयांची रक्कम देऊन बोगस नियुक्ती प्रमाणपत्र मिळविल्याबाबत

**(४४) १२८८४६ (०६-१२-२०१८). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक महानगरपालिकेत शिपाई ते लेखापालपर्यंत विविध पदांवर नियुक्तीसाठी लाखो रुपयांची रक्कम देऊन बोगस नियुक्ती प्रमाणपत्र मिळालेल्या दहा कर्मचाऱ्यांनी प्रशासनाकडे पत्र सुपुर्द केले असून भरती प्रकरणातील पिडीतांची संख्याही ३५ वर गेली असल्याचे दिनांक ९ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर फसणवूक करणारी व्यक्ती ही महानगरपालिकेच्या आस्थापना विभागातील कर्मचारी असून दिनांक ७ जुलैपासून फरार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नूसार सदर प्रकरणातील दोषी कर्मचाऱ्यावर शासनामार्फत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-१२-२०१८) :** (१) होय. यासंदर्भात नाशिक महानगरपालिकेकडे १३ तक्रारदारांनी तक्रार केली आहे.
(२) व (३) • सदर प्रकरणातील कर्मचारी हा नाशिक महानगरपालिकेच्या आस्थापना विभागात

शिपाई पदावर कार्यरत होता.

• सदर कर्मचारी दि.०२/०७/२०१८ पासून अनधिकृतपणे अनुपस्थित होता.

महानगरपालिकेने सदर कर्मचाऱ्यास दि.०१/०९/२०१८ पासून निलंबित केले आहे.

• महानगरपालिकेमार्फत सदर कर्मचाऱ्याविरुध्द दि.१३/८/२०१८ अन्वये विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली असून, प्राथमिक चौकशीचे कामकाज पुर्ण झालेले आहे.

• विभागीय चौकशीचा अहवाल महानगरपालिकेस अद्याप प्राप्त झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती येथील महानगरपालिकेच्या स्थानिक करामध्ये (एलबिटी)**
**आर्थिक गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(४५) १३०३६० (०८-१२-२०१८) श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथील महानगरपालिकेच्या स्थानिक करामध्ये (एलबिटी) महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आर्थिक गैरव्यवहार केल्याने त्यांची चौकशी करुन संबंधितांवर गुन्हा दाखल करून फौजदारी कारवाई करण्याची मागणी महानगरपालिकेच्या आयुक्तांकडे तसेच शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडे दिनांक २५ सप्टेंबर, २०१८ रोजी व दिनांक १ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करून कोणता निर्णय घेतला वा त्यानुसार संबंधितांवर कोणती प्रशासकीय वा दंडात्मक कारवाई गठीत करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०१-२०१९) :** (१) अमरावती महानगरपालिकेकडे अशी तक्रार प्राप्त झालेली आहे.

(२) व (३) प्राप्त तक्रारीबाबत चौकशीअंती खालील वस्तुस्थिती दिसून येत असल्याचे, आयुक्त अमरावती महानगरपालिका यांनी त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.

• स्थानिक संस्था कर अधिनियमाच्या कलम ३३ (७) नुसार कुलकर्णी ऑटोमोबाईल्स यांना सन २०१२-२०१३ व सन २०१३-२०१४ करिता दिनांक १५/०६/२०१५ व दिनांक १८/०६/२०१५ रोजी आवश्यक ती नोटीस पाठविण्यात आलेली होती.

• त्यानुसार संबंधीत पक्षकाराने विहित मुदतीत उपस्थित राहून अथवा अन्य प्रकारे कोणतेही पुरावे सादरही केले नाहीत, त्यामुळे या अधिनियमातील कलम ३३ (५) नुसार असलेल्या अधिकारातंर्गत उपलब्ध अभिलेखाच्या आधारे, एकतर्फी कर निर्धारण करुन, दिनांक ०७/०८/२०१८ रोजी आदेश पारित केलेले आहेत व त्यानुसार अर्जदारास कळविण्यात आलेले आहे.

• सदरचे आदेश अर्जदारास मान्य नसतील तर, अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदार या

आदेशाविरोधात अपील दाखल करु शकतो.

• या प्रकरणात झालेले कर निर्धारण हे अधिनियमातील तरतुदीनुसार झालेले असून, त्यानुसार आकारण्यात आलेला कर हा संबंधीत पक्षकाराने थेट बँकेत भरणा भरावयाचा असल्याने, या आकारणीत गैरव्यवहार होण्याची शक्यता नाही आणि तसे झाल्याचे दिसूनही आलेले नाही.

---

**अहमदनगर शहरातील प्रस्तावित असलेल्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याबाबत**

**(४६) १३१२१४ (०८-१२-२०१८) श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर शहरातील प्रस्तावित असलेल्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासाठी जागेची मागणी शासनाकडे गत अनेक वर्षापासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाकडून कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-१२-२०१८) :** (१) अहमदनगर शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्तित्वातील अर्धाकृती पुतळ्याची जागा नियोजीत उड्डाणपुलाने बाधीत होत असल्याने, अहमदनगर महानगरपालिकेने जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्याकडे दिनांक २०/०७/२०१८ अन्वये, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यासाठी जागेची मागणी केली आहे.

(२) पुतळा बसविण्याबाबत महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये तरतुद केलेली आहे, असे अहमदनगर महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील निवड झालेल्या सर्व शहरातील स्मार्ट सिटी योजना प्रभावीपणे सुरु करण्याबाबत**

**(४७) १३१४६० (०५-१२-२०१८) कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ठाणे, कल्याण-डोंबिवली, नाशिक, सोलापूर, नागपूर, पुणे, पिंपरी-चिंचवड, औरंगाबाद, अमरावती, नवी मुंबई व मुंबई या अकरा शहरांची स्मार्ट सिटी योजनेसाठी निवड करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत दोन वर्षात नागपूर व ठाणे वगळता इतर ठिकाणी स्मार्ट सिटी योजना कागदावरच असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजना कार्यान्वित न होण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, निवड झालेल्या सर्व शहरातील स्मार्ट सिटी योजना प्रभावीपणे सुरु करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-१२-२०१८) :** (१) केंद्र शासनाने स्मार्ट सिटी योजना सन, जून २०१५ मध्ये सुरु केली असून मागील तीन वर्षात तीन टप्प्यात राज्यातील पुणे, सोलापूर, नाशिक, कल्याण-डोंबिवली, औरंगाबाद, ठाणे, नागपूर, पिंपरी-चिंचवड या आठ शहरांची निवड चॅलेंज प्रक्रियेद्वारा स्मार्ट शहर म्हणून विकसित करणेकामी करण्यात आलेली आहे.
(२) व (३) • सद्यस्थितीत स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत वरील आठ शहरांमध्ये एकूण रुपये २५३०३.७१ कोटी इतक्या किमतीचे एकूण ३६९ प्रकल्प राबविण्यात येत आहेत.
• सदर योजनेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांपैकी एकूण रु. १३५३.२५ कोटीचे ४६ प्रकल्प पूर्ण झाले आहेत, रुपये ३७४५..९३ कोटी रूपयांचे ८६ प्रकल्पांचे कार्यादेश काढण्यात आलेले आहेत, तर एकूण ७९७६.३२ रूपयांचे ६९ प्रकल्प निविदा प्रक्रियेत असून एकूण रूपये १२२२८.२५ कोटींच्या १६५ प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आलेले आहेत.
(४) व (५) • स्मार्ट सिटी योजनेंतर्गत प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेण्याकरीता गृहनिर्माण व शहरी विकास मंत्रालय, भारत सरकार तसेच राज्य शासनाकडून वेळोवेळी आढावा घेण्यात येतो.
• स्मार्ट सिटी योजनेंतर्गत प्रकल्पांच्या अंमलबजावणीबाबतचे सर्व वित्तीय व प्रशासकिय अधिकार हे संबंधित विशेष उद्देश वहनास देण्यात आलेले आहेत.

---

**नाशिक महानगरपालिकेचे आयुक्त यांनी पाणी मीटरची दुरुस्ती ग्राहकांकडूनच करुन घेण्याचा निर्णय घेतला असल्याबाबत**

**(४८) १३२१७० (१०-१२-२०१८) श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक महानगरपालिकेचे आयुक्त यांनी ग्राहकांकडूनच पाणी मीटर दुरुस्त करुन घेण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाणी मीटर बंद असेल तर नोटीस देऊन महिन्याभरात दुरुस्ती करण्याची संधी दिली जाणार आहे त्यानंतरही मीटर बंद आढळले तर मात्र वापरातील अतिरिक्त वाढ गृहीत धरुन दुप्पट पाणीपट्टी कर आकारली जाणार असल्याची बाब माहे जुलै, २०१८ च्या शेवटच्या आठवडयात वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासन कोणती कार्यवाही करणार वा करित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) सदर बाब महानगरपालिकेच्या पाणीपट्टी आकारणी धोरणात असून, पाणी मीटर दुरुस्ती बद्दलच्या सुचना यापुर्वी पासूनच महानगरपालिकेमार्फत ग्राहकांना देण्यात येणाऱ्या पाणी बिलावर मागील पृष्ठावर छापलेल्या आहेत.

महानगरपालिकेमार्फत दिनांक २४/०५/२०१८ रोजी काढण्यात आलेल्या आदेशात सदर सुचना पुन्हा नमुद केलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परेल, शिवडी भूभाग क्र.८४१ या जागेवर एम.बी.कन्स्ट्रक्शन या विकासकाने केलेले अतिक्रमण

**(४९) १३२५१२ (०४-१२-२०१८) श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परेल, शिवडी येथील भूभाग क्र.८४१ या शासकीय जागेवर एम.बी.कन्स्ट्रक्शन या विकासकाने अतिक्रमण करुन पत्राशेड बांधल्याप्रकरणी भ्रष्टाचार निर्मुलन समितीच्या सदस्याने दिनांक १३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास उपजिल्हाधिकारी, कुलाबा विभाग व जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्याकडे तक्रार करून सदर अतिक्रमण निष्कासीत करण्याबाबत मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरचे अनधिकृत पत्राशेड निष्कासीत करून अतिक्रमण करणाऱ्या विकासकाविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२४-१२-२०१८) :** (१) भूभाग क्र. ८४१, परेल शिवडी या जागेवर एम.बी. कंस्ट्रक्शन या विकासकाने अतिक्रमण करुन पत्राशेड बांधल्याबाबत श्री.बाळासाहेब हेगडे यांची तक्रार अपर जिल्हाधिकारी (अति./निष्का.), मुंबई शहर यांच्या कार्यालयात प्राप्त झाली आहे.

(२) अपर जिल्हाधिकारी (अति./निष्का.), मुंबई शहर यांच्या अहवालानुसार त्या कार्यालयातील भूमापक व महसूल निरिक्षक यांच्यामार्फत दि.६.३.२०१८ व दि.३.११.२०१८ रोजी प्रत्यक्ष स्थळपाहणी केली आहे. सदर स्थळपाहणीनुसार सदरचे पत्रे (पत्र्याचे कुंपण) न.भू.क्र.८४१ च्या हद्दीत उभारल्याचे सकृतदर्शनी दिसून येत नसून न.भू.क्र. ८४१, परेल शिवडी या भूखंडावर एम.बी. कंस्ट्रक्शन या विकासकाने अतिक्रमण केल्याची बाब निदर्शनास आली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक महानगरपालिकेने बांधलेल्या उड्डाणपुलांची दुरवस्था झाल्याबाबत**

**(५०) १३३१५९ (१०-१२-२०१८) श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिकेने कोटयवधी रुपये खर्च करुन बांधलेल्या उड्डाणपुलांची दुरवस्था झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या उड्डाणपूलाच्या दुरवस्थेची पाहणी शासनाने केली आहे काय,

(३) असल्यास, या उड्डाणपूलांची तातडीने दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-१२-२०१८) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

• नाशिक महानगरपालिकेने नाशिक रोड येथे रेल्वे लाईनवर सुमारे १५ वर्षांपूर्वी उड्डाणपुल बांधलेला असून, सदर पुलाला तडा गेल्याची तक्रार स्थानिक नागरीकांनी महानगरपालिकेकडे केली होती.

• त्याअनुषंगाने, महानगरपालिकेने पुलाची पाहणी केली असता पुलाच्या मूळ बांधकामावेळी त्यात वापरलेले Strip Seal Joint चे Elastometric Pad Socket काही ठिकाणी बाहेर आल्याचे निदर्शनास आले आहे.

• याबाबत महानगरपालिकेने तज्ञ तांत्रिक सल्लागार यांची नियुक्ती करुन त्यांचेमार्फत संपूर्ण उड्डाणपुलाची तपासणी करण्यात आली आहे.

• सदर तपासणीत उड्डाणपूल संरचनात्मक दृष्ट्या सक्षम व सुरक्षित असल्याचा अहवाल संस्थेने दिला आहे.

• सदर उड्डाणपुलाच्या Strip Seal Joint चे काम, याप्रकारचे विशेष काम करणाऱ्या संस्थेमार्फत करण्याचे महानगरपालिकेमार्फत प्रस्तावित असून, सदर संस्थेच्या प्रतिनिधींसमवेत प्रत्यक्ष पुलाची पाहणी करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.